# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २९/०१/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २९/०१/२००४ रोजी सभा सुचना क्र. ३१ दि. २३/०१/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ८) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, हे जे आपले दर वेळेला इतिवृत्तांत दिले जाते. तर मागच्या सभेमध्ये असे ठरले की, एक सभेनंतर एक सभेची फक्त सचिवांना माफी दिलेली आहे की, तुम्ही एका सभेनंतर दिली तरी चालेल. पण दोन दोन, तीन तीन सभांची एकदम प्रोसीडींग देतात आणि मग ती सगळी आपल्याला बघत रहायला लागते आणि मग ही पटापट घाई होऊन त्यामध्ये ती मंजुर केली जाते. हे एक आहे. मागे अशी दोन दोन, तीन तीन सभेची दिली होती. यापुढे देण्यांत येऊ नये अशी माझी सभेमध्ये सुचना आहे. त्याची नोंद तुम्ही इतिवृत्तांतामध्ये करुन घ्या.

**रिटा शहा :-**

सभापती साहेब, प्रोसीडींगचे चालले आहे. मागच्या प्रोसीडींगमध्ये ठराव झालेला आहे. ते इम्प्लिमेंट झाले नाही. तर माझी एक विनंती आहे, जाहिरातबद्दल होते. आपण मागे जाहिरात दिली

होती. प्रशासनाच्या वेळी आपण त्या संस्थेला दिली होती. त्याचे पाच बोर्ड आपण त्याचप्रमाणे त्याला द्यायचे असा मी चर्चेत भाग घेतला होता आणि नाईक साहेबांनी ते मान्यही केले होते. ते इम्प्लिमेंट होत नाही. कारण ते असे बोलतात आमच्यापर्यंत ठराव अजून पोहोचलाच नाही. आम्हांला काय मॅसेज मिळालाच नाही. मग आपण ठराव करायचा आणि त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. मग असा लिंगरींग करणार. मग तो ठराव करायचा अर्थ काय? पण तो ठराव झालेला होता. मग तो ठराव त्या डिपार्टमेंन्टपर्यंत पोहोचत का नाही?

**प्र. सचिव :-**

इतिवृत्तांत आम्ही सर्व डिपार्टमेंटला देतो.

**रिटा शहा :-**

मग ते तुमच्यासमोर असे जवाब देतात की, आमच्यापर्यंत पोहोचला नाही आणि ते होऊ शकत नाही, असे करु शकत नाही. मग स्टँडींगला जे आपण ठराव पास केले, एक खालच्या दर्जाचा ऑफीसर आम्हांला असा जवाब देतो की, ते होऊ शकत नाही. मग आम्ही इथे चर्चेत भाग घेऊन पास करण्याचा इथे अर्थ काय आहे?

**प्र सचिव :-**

नाईक साहेब येऊ देत.

**रिटा शहा :-**

नाईक साहेब आले ते बरोबर आहे. पण चर्चेत भाग घेतला, चर्चेमध्ये होय बोलले, सर्व झाल्यानंतर ते इम्प्लिमेंन्ट का होत नाही? नाईक साहेब असतील किंवा नसतील. प्रोसीडींगमध्ये आले आहे. आपण सचिव आहात. प्रोसीडींगमध्ये आले की नाही आले? ते मान्य झाले की नाही झाले आहे?

**प्र. सचिव :-**

नाईक साहेब येऊ देत. ते खुलासा करतील.

**रिटा शहा :-**

साहेब, जरा ते बघा. त्या संस्थेने प्रशासनाला मदत केली आहे आणि प्रशासनाने तोंडी आश्वासन पण दिले होते. आश्वासन नाही म्हणजे एक वादा केला होता की, तुम्ही आमचे काम केले आहे. तर तुम्हांला आम्ही दहा टेंडर देऊ. मग आता कुठल्या संस्थेचे आपण मी बोलली ती मी एक महिला आहे म्हणून मी हा मॅटर काढते. मग त्याला इम्प्लिमेंट करायला तुमच्या डिपार्टमेंन्टचा माणूस सांगतो, आमच्यापर्यंत प्रोसीडींग पोहोचत नाही. तर असा जवाब देतो. सचिव साहेब, माझी एक विनंती आहे, त्याच्यावर लगेच तुम्ही प्रोसीडींगची कॉपी देऊन रिपोर्ट करा. मग आता काय राहिले आहे?

**प्र. सचिव :-**

अगोदर प्रोसेडींग सगळ्यांना दिलेले आहे. पुन्हा ते द्यावे.

**रिटा शहा :-**

परत त्याचप्रमाणे त्यांना दिलेले आहे. मग त्यांना अजून पाच देऊन टाका. त्या दिवशी आपले ठरले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे सन्मा. सदस्या रिटा शहा बोलतात तो मी मागे विषय घेतला होता. आपल्या इकडे जे ठराव पास होतात त्याचे इम्प्लिमेंन्टेशन किती कालावधीमध्ये संबंधित विभागाला गेले पाहिजे त्या ठरावाची कॉपी आपल्या सहिसकट सुचक, अनुमोदकाच्या सहिसकट त्या डिपार्टमेन्टला किती दिवसांत गेली पाहिजे याचा निर्णय आज आपण या सभेमध्ये लावा. कारण मागच्या वेळेला सगळ्यात महत्वाचा आता आपण शहरामध्ये रिक्षा फिरवतो की, टॅक्स जमा झालेला नाही. आर्थिक तुट आहे. नगरपालिकेला लॉस आहे. पण थोडे जरा आपले आपण वाकून बघितले तर आपल्यामुळे ते झालेले आहे. कारण जो निर्णय तुम्ही चांगल्या प्रकारे घेतला तो दिड महिना लोकांपर्यंत गेला नाही. परिणामी करोडो रुपये नगरपालिकेचे येणे राहिले आणि हा ठराव, ठरावाची कॉपी एक महिन्यापर्यंत आपली सही झाली नव्हती आणि दिड महिने प्रशासनापर्यंत गेला नव्हता. त्याकरिता आजच्या सभेमध्ये सन्मा. सदस्या रिटा शहा यांनी जे सांगितले त्याला मी दुसरे सर्पोटींग प्रकरण देतोय आणि मी त्याचा मागे उल्लेखसुद्धा स्थायी समितीमध्ये केला होता. पण आपल्याकडून काही निर्णय आला नाही अशा वारंवार

चुका होतात. आपण या समितीचे सभापती आहात. आपला निर्णय महत्वाचा आहे. प्रशासनावर त्याचा अंकुश असतो किंवा मार्गदर्शन असते आणि मार्गदर्शन जी काही तत्वे आपण इथे मंजुर करतो, जी आपण ठरवितो हे सर्व त्या त्या वेळेला त्या त्या डिपार्टमेन्टला लगेच म्हणजे एक दोन दिवस, तीन दिवस, चार दिवस कालावधी सचिव तुम्ही सांगा. त्याच्यामध्य ते गेले पाहिजे. न गेल्यास त्याच्यावर अगोदरचा ५६ ठराव पास केला. त्यानुसार तो अधिकारी, कर्मचारी जो कोण असेल तो पात्र असेल. सभापती साहेब तुम्ही संबंधित खात्याला सर्व खानापुर्ती करुन चार दिवसांत, दोन दिवसांत लेखी प्रतीसकट आम्ही त्यांना अंमलबजावणी करण्याकरिता त्या त्या विभागाला सुपूर्द करु. याबद्दल आपला आता काय निर्णय आहे तो आम्हांला ऐकवा.

**प्र. सचिव :-**

मागच्या सभेपर्यंत सर्व जे ठराव झालेले आहेत. जी आपली मागची सभा झाली ते देखील ठराव सगळ्या विभागाला दिलेले आहेत. जे संबंधित विभाग होते त्या विभागाला कारवाईसाठी पोहोचते केलेले आहेत. तशी पोच माझ्याकडे उपलब्ध आहे.

**प्रकरण क्र. २१६ :-**

दिनांक २९/१२/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १९७ :-**

दि. २९/१२/२००३ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. नितीन ठाकूर.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१७ चे वाचन केले.)**

**रिटा शहा :-**

अध्यक्ष महोदय, सभेच्या सुरुवातीला मी आपली एक परवानगी मागते की, सभा संपल्यानंतर पाच मिनिट ऑक्ट्रॉयच्या विषयावर चर्चा करायला परवानगी द्यावी.

**मा. सभापती :-**

सभा संपल्यानंतर चर्चा करायला परवानगी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, तहकुब प्रकरण २१७ वर आपण मला बोलायला परवानगी द्यावी. सदर प्रस्ताव हा मागच्या सभेला आणला होता. परंतु सदर प्रस्तावाचा आम्ही या एक आठवड्यामध्ये अभ्यास केला. ह्याच्यातील बहुसंख्य रस्ते हे आजच्या परिस्थितीला काही पूर्ण अवस्थेत आहेत काही अपूर्ण अवस्थेत आहेत. काही ठिकाणी मातीचा भराव झालेला आहे. काही ठिकाणी डांबरीकरण झालेले आहे. काही ठिकाणी डांबरीकरण, मातीचा भराव, रस्ते, गटारे आणि बत्या ह्यासुद्धा आहेत. रस्ता पूर्ण झालेला आहे. सदर विकास योजनेतील रस्त्याच्या प्राधान्य यादीमधील रस्ते आपण जी आता त्याला मंजुरी देणार आहोत ही मंजुरी दिल्यानंतर सदर प्रस्तावाचे मी आता परफेक्ट सांगू शकत नाही. मी काही इंजिनिअर नाही. परंतु एका किलोमीटरला जवळ जवळ पन्नास ते साठ लाख खर्च आपल्या महापालिकेला येतो. असे कित्येक किलोमीटरचे रस्ते झालेले रस्तेसुद्धा याच्यामध्ये इन्क्लुड केलेले आहेत. त्याचे रितसर पत्र हा ठराव मंजुर होण्याअगोदर आपल्याला सगळ्यांना त्याचे एक अवलोकन व्हावे, माहिती व्हावी म्हणून एक पत्र रितसर मी आजच्या तारखेला दिलेले आहे. ते ह्याच्याकरिता दिलेले आहे की, ह्याच्यातील काही रस्ते जे खाजगी संकुल आहेत. त्याच्यामधून हे जातात आणि त्यामुळे काही प्रॉपर्टी आजही आपण खाजगी लोकांच्या ताब्यामध्ये ती आहे. तसेच काही ठिकाणी जी

प्रायोरिटी दिली गेली पाहिजे.  काही ठिकाणी ती प्रायोरिटी जाणूनबुजून किंवा अनावधानाने ती राहिलेली आहे.  ते सुद्धा मी यामध्ये लोकेट केलेले आहे.  तुम्हांला ते लेखी स्वरुपात सहीनिशी मी दिलेले आहे.  याच्यात काही रस्ते डबलिंग झालेले आहेत.  ते खाली मी माझ्या पॅरेग्राफमध्ये शेवटी दिलेले आहे.  कुठले कुठले रस्ते डबलिंग झाले आहेत आणि परत परत ते रस्ते रिपीट झाल्या कारणाने ते किलोमीटर परत परत रिपीट होणार आणि त्याचा बजेट वर परिणाम होणार आहे.  कारण पाच, सहा, सात, आठ, दहा करोड रुपयांची जर आपल्याला ह्याच्यामध्ये काही गरज असली तर ते डबल होण्याची शक्यता आहे.  ते होणारच, ह्याला मंजुरी दिल्यामुळे.

**मा. सभापती :-**

जरा कुठले-कुठले आहेत ते सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये १६, १७, १८, १९ ह्या रस्त्याचे डबल नियोजन केले आहे.  साहेब, शिटवर हा विषय कुठे?  आपल्याला भरपूर वेळ लागणार आहे.  तसे डिटेल केले तर कारण मी शिटमध्ये हा २२, २३ शिट नंबर ह्याच्यामध्ये बरेचसे म्हणजे झालेले रस्ते याच्यात लाईनिंग केलेले जेवढे रस्ते आहेत ह्या रस्त्यावर मी स्वतः पायी फिरुन आलेलो आहे आणि हे बहुतेक रस्ते झालेले आहेत.  काही व्हायचे आहेत.  म्हणजे हा रस्ता तर अगदी तिकडचा शिट येथे केला तर हा रस्ता पूर्ण झालेला आहे.  या शिटनुसार २१ नंबर शिटला तसेच २२ नंबर शिटला.

**मा. सभापती :-**

डबलबद्दल मला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

२१ नंबर शिटमध्ये हे लोकेट केले आहे.  प्लस पत्र दिले आहे.  तसेच चार नंबर शिटला हा रस्ता आता प्रायोरिटी बेसवर आपण घेतला पाहिजे.  कारण स्टेशनच्या समोर ह्याच्यामध्ये जे आरक्षण नंबर फक्त ५७ दाखविले आहे.  ते ५७ न ठेवता ते आरक्षण नंबर ६० पासून सुरु करुन तो एस.टी. डेपोच्या गेटपर्यंन्त डांबरीकरण भराव वगैरे सगळा झाला आहे.  ती अमाऊन्ट त्यामधून डिडक्ट करुन त्याच्या पुढचा रोड पुढे घ्यावा.  कारण प्रायोरिटी कसली आता स्टेशनच्या समोरची तर स्टेशनच्या समोरचा रस्ता हा पहिला झाला पाहिजे.  तो तुमचा स्टेडिअमपर्यंन्त गेला.

**मोहन पाटील :-**

किती नंबरचे तुम्ही सांगितले?

**मिलन म्हात्रे :-**

शिट नंबर ३ मध्ये आपण जे दिले आरक्षण क्र. ५७ एस.टी. डेपो ते स्टेडिअम त्यामध्ये आरक्षण नं. ६० पाहिजे.  आरक्षण नं. ६० ते स्टेडिअम आरक्षण नं. ९१ पर्यंन्तचा ३० मीटरचा रुंद रस्ता.  शिट नंबर ४ व शिट नंबर २० मध्ये जे आहे ते आरक्षण नंबर ९१, शिट नंबर २० ला आहे.  आरक्षण नंबर ६० हे शिट नंबर ४ ला आहे.  ह्याच्यानंतर सिरियल नंबर ४ आरक्षण क्रमांक १२२ चौपाटी.  भाईंदर पूर्व चौपाटी असे पाहिजे.  दोन चौपाट्या आहेत.  त्याच्यामधून आरक्षण क्रमांक १२२(अ) ते या रस्त्याचे प्रायोरिटी बेसवर १२२(ड) पर्यंत काम झाले पाहिजे.  कारण (ड) आपण उल्लेख केलेला नाही.  कारण (ड) हा महत्वाचा भाग आहे.  तिथे अगोदरच नगरपालिकेचा भराव झालेला आहे.  ह्याच्यावर नगरपालिकेला आजच्या तारखेला खर्च येणार नाही आहे आणि हा (अ) पासून (ड) पर्यंन्त काही किलोमीटरचा भाग आहे.  त्याच्यातील मातीच्या भरावाचे पैसे त्या रस्त्याकरिता वगळायचे आहेत.  तर ह्याच्यामध्ये सुधार करुन आरक्षण क्रमांक १२२(अ) ते आरक्षण क्रमांक १२२(ड).  कारण चौपाटीचे संपूर्ण आरक्षण त्यामध्ये येते.  ठराव पूर्णपणे झालेला आहे.  काही ठिकाणी अतिक्रमण आहे.  ते काढणे आपल्याला गरजेचे आहे.  लोकांच्या त्याच्यामध्ये तक्रारीपण आलेल्या आहेत.  नवघर तलावापासून एक्सप्रेस हायवे पर्यंन्त रस्ता हा लास्ट प्रायोरिटीमध्ये ठेवावा असे मला वाटते.  कारण ह्याच्यातील काही फर्स्ट प्रायोरिटी आहेत.  त्या याच्यात घेतलेल्या नाहीत.  अनुक्रमांकसुद्धा ५ आहे.  मौजे नवघर तलावापासून एक्सप्रेस हायवेपर्यंन्तचा इन्टर रस्ता ह्याच्यातील अर्धा रस्ता हा काही लोकांनी केलेला आहे.  बहुतेक रवी ग्रुपने ते रोडचे काम केलेले आहे आणि तो रस्ता यामध्ये आपण परत प्रस्तावित केलेला आहे.  आरक्षण क्रमांक ११५ बी.एस.ई.एस. ते आरक्षण क्रमांक २२९ हा रस्ता डबल झालेला आहे.  शिट नंबर २२ त्याच्यानंतर हे बाकीचे जे ७, ८ आणि ९ हा परत क्लब झालेला आहे.  त्यानंतर १६, १९ आणि १८ हासुद्धा एकत्र क्लब झालेला आहे.  त्याची रितसर म्हणजे डिटेल तुम्हांला माझ्या

त्या पत्रामध्ये दिलेली आहे. आरक्षण क्रमांक १७९ ते १७६, १५ व १८ मीटर रुंद रस्ता सर्व्हे नंबर ४९५ ते ५०४ पर्यंत आपल्याला प्रायोरिटीमध्ये विकसित केला गेला पाहिजे. तो ह्याच्यामध्ये आरक्षित केला नाही आहे. त्यानंतर प्लेझंट पार्कचा पोरशन हा काही पूर्ण झालेला आहे. शिट नंबर २९ एम.आय.डी.सी.मध्ये झालेला रस्ता हा जवळ जवळ ५० फुट ते ८०० मीटर लांब एवढा रस्ता एम.आय.डी.सी. एरियामधील आजच्या तारखेला पूर्ण झालेला आहे. तो याच्यामध्ये प्रस्तावित केलेला आहे. जे झालेल्या कामाचे डिडक्शन या प्रस्तावातून करावे. त्यानंतर संघवी बिल्डर मुद्दा क्रमांक १०, काशीमिरा रस्त्याकडून वसुंधरा इमारतीकडे जाणारा १८ मीटरचा रस्ता या रस्त्यांपैकी जवळ जवळ १५० मीटर लांब एवढा संघवी बिल्डरने स्वतःच्या खर्चाने डांबरीकरण, मातीचा भराव इत्यादी कामे त्यांच्या खर्चाने केलेली आहेत. शिट नंबर २९ वर हा लोकेट झालेला आहे. त्याच्यानंतर आरक्षण क्रमांक १७६ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान, ३६ हेक्टर क्षेत्र, सर्व्हे नंबर ८१, ८२, ९२. शिट नंबर २१, १७८ खेळाचे मैदान भाईंदर. शिट नंबर ८३, ८४, ९१, ६८ जवळ जवळ एक हेक्टर जागा आहे. शिट नंबर २१ ही जागा मोकळी असून त्याच्या लगतचा जो रस्ता आहे तो आपल्याला प्रायोरिटी बेसवर करायला लागेल. आरक्षण क्रमांक १७९ हायस्कूल, प्ले ग्राऊन्ड. सर्व्हे नंबर ८४, ९०, ९१ म्हणजे जवळ जवळ ०.७५ एकर भोवती जागा आहे. शिट नंबर २१ जागा आजच्या तारखेला मोकळी आहे. म्हणजे ह्या जागा रस्ता झाल्यास मिरा रोडसारख्या शहरातल्या सेन्टरला ही गार्डन, प्ले ग्राऊन्ड वगैरे रोड केल्याने लगेच वापरामध्ये येण्याची शक्यता आहे. आरक्षण क्रमांक ७९ ते ७६, १५ आणि १८ मीटरचा रस्ता सर्व्हे नंबर ४९५ ते ५०४ पर्यंत लवकरात लवकर विकसित करणे गरजेचे आहे. तसेच कनाकिया रोडचे जे पोलिस स्टेशन आहे. काशी मिरा रस्ता जो छत्रपती शिवाजी महाराज मार्ग ते कनाकिया पोलिस स्टेशन यामधील काही पार्ट नगराध्यक्ष कालावधीमध्ये मागच्या दिड वर्षापुर्वी डांबरीकरणाचे टेन्डर काढून आपण तो रिपेअर केला आहे. त्यातील काही भाग आता विकासक रिपेरिंग करुन द्यायला तयार आहे. त्या रस्त्याचा झालेला पोरशन या प्रस्तावातून रनिंग मिटर किंवा किलोमीटर वाईज डिडक्ट करावा आणि हे जे सर्व प्रस्ताव आहेत ते फेरविचार करुन रिसीटवर व्यवस्थित देऊन घाईघाई न करता जे झालेले आहे. कारण आता एक गेल्या आठवड्यामध्ये सर्व लोकांनी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली असेल. ठाणे महानगरपालिकेच्या जवळजवळ ५८ कर्मचाऱ्यांवर बडतर्फीचे प्रस्ताव आजच्या तारखेला मंत्रालयामध्ये विचाराधीन आहेत. आम्ही कोणीही या प्रस्तावात म्हणजे अशा प्रकारच्या ह्याच्यात कुठे अडकण्याची आम्ही इच्छा व्यक्त करीत नाही. म्हणून हा प्रस्ताव डिटेल माहिती करुन आपण जे प्रस्तावित केलेले रस्ते याच्यावर मी स्वतः जाऊन आलेलो आहे. काय काय कामे झाली? कुठल्या कुठल्या विकासकांनी ह्याच्यामध्ये कामे केलेली आहेत? ते या सभेत या प्रस्तावावर मी आपल्याला लेखी सुचना आणि तोंडी सुचना या सभेत केलेली आहे. माझ्या सुचनांचा आपण गांभीर्याने विचार करावा. एक महत्वाची गोष्ट, प्रस्ताव देतांना बांधकाम विभाग आणि आपले नगररचना यांनी संयुक्तरित्या बसून या प्रस्तावाचा कुठेही विचार केलेला दिसत नाही. यापुढे कुठल्या कामाचे टेंन्डर निघाले आहेत त्या विभागाचे टेंन्डर आणि पेमेन्ट झालेल्या रस्त्याचेसुद्धा दिलेले आहेत. याचा सगळ्यांचा विचार करुन जे उर्वरित राहिलेले काम आहे त्याचा लवकरात लवकर विकास करावा अशी माझी इच्छा आहे. ही नम्र विनंती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापतींच्या परवानगीने बोलतो, या विकास आराखड्यामध्ये काही मॉडिफिकेशन झाले आहेत. काही आरक्षणे वगळली आहेत किंवा काही आरक्षणे वाढविली आहेत का?

**चंद्रकांत वैती :-**

उपआयुक्त साहेब, आपण याबद्दल डिटेल माहिती नंतर द्यावी. पहिले या बाबतीत सदस्यांची काय मते आहेत ती जाणून घेतलेली बरी.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, जे मॉडिफिकेशन किंवा जे वाढीव बदल झालेले आहेत. महापालिकेतर्फे जे बदल केलेले आहेत. ते महापालिका किंवा नगरपालिका असतांना जे ठराव आणि बदल झालेले आहेत ते सोडून बाकीचे बदल हे शासनामार्फत झालेले आहेत. त्यामुळे मागच्या वेळेला आपला जकातीचा मुद्दा होता. १८ मीटर सोडायचा किंवा शाळेचा एक होता. हे दोन-तीन महासभेने किंवा पुर्वी कौन्सील होती त्या कौन्सीलने मंजुरी व्यतिरिक्त जे डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये बदल झालेले आहेत ते

शासनाकडून बदल होऊन आलेले आहेत. महापालिकेने किंवा नगरपालिका असतांना बदल केलेले नाहीत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग त्याची टिपणी आम्हांला दिलेली नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

महासभेमध्ये ज्यावेळेला बदल करण्याचा विषय आला त्या त्या वेळेला दिलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या गोषवाऱ्याबरोबर नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

या गोषवाऱ्यावर गव्हर्नमेंन्टने काय बदल केला आहे हे पुस्तकातच आहे. डेव्हलपमेंन्ट प्लॅन आणि डेव्हलपमेंटचे पुस्तक जे आपल्याकडे दिलेले आहे त्या पुस्तकातच ते बदल आलेले आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्या व्यतिरिक्त आपण सरकारी जो चौकला १०७ मध्ये जो सर्व्हे चालला आहे तिथे कुठले आरक्षण तुम्ही हे करणार आहे? तिथे नोटीसा आल्या, म्हणजे आरक्षण करणार आहे की सरसकट.

**एन. आर. शेंडे :-**

जे शासकीय जागेवर आरक्षणे आहेत. त्या आरक्षणाची मागणी आपण गव्हर्नमेंन्टकडे केलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

म्हणजे हे नवीन आरक्षण आपल्याला करायचे आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नवीन नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मुंबई म्युनिसिपाल्टीमध्ये मच्छीचे मंडई होलसेल मार्केट आहे. ओल्या मासळीचे मार्केट आहे. तिथे आमच्या मत्स्यकन्या, मस्त्य महिला स्टेशनच्या बाजूला बाजार भरतो. संपूर्ण वसई ह्या बाजूची लोक सगळी तिथे मासळी घेऊन येतात. तर ह्या लोकांसाठी किंवा सुक्या मासळीसाठी जसे मरोळला त्यांची मंडई आहे. आता नवीन त्यांनी विकसित केली, बांधली, तर असे आपल्या नगरपालिकेचे धोरणात्मक असे काही धोरण आहे का, की ओल्या मासळीचे एखादे मार्केट असे आहे का?

**मा. सभापती :-**

ओल्या आणि सुक्याचा असा काही प्रश्न येत नाही. एकच मार्केट होणार. पश्चिमेला आणि पुर्वेला.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी असे बोलत नाही. माझ्या बोलण्याचा एवढाच उद्देश आहे की, त्यांनी जे क्रॉफर्ड मार्केट आहे. संपूर्ण मुंबईला त्याच्याने मासळी पुरवितात.

**मा. सभापती :-**

क्रॉफर्ड मार्केट आणि भाईंदरचे मार्केट असे दोघांमध्ये मध्ये फार फरक आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तसे जवळजवळ क्रॉफर्ड मार्केटला हे चालते तसे एवढे लोक इथे आजूबाजूचे लोक मासळी घेऊन येतात. त्यांना जर आपण व्यवस्थित मंडई बांधली आणि त्यांना जर आपण बसायला दिले. तिथे रेल्वेच्या जागेमध्ये मार्केट भरते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेब, पहिल्यांदा आपल्याकडे जो विषय रस्त्याचा चर्चेला आला आहे. तो रस्त्याचा विषय क्लिअर झाल्यानंतर मग बाकीच्या आरक्षणाबाबत तुम्ही चर्चा करुन निर्णय घ्या. पहिले रस्त्याचे जे आहे, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले आहे की, काही रस्ते जागेवर झालेले आहेत. तर त्या रस्त्याबाबत बांधकाम विभाग आणि नगररचना विभागाने पाहणी करुन ते रस्ते घेण्याची आवश्यकता नाही. ते वगळून बाकीचे रस्ते घेणे जरुरीचे आहे हे प्रायोरिटी बेसीसवर ठरवा. कारण काय होईल जागा ताब्यात घेण्याचे प्रोसीजर सुरु झाल्यानंतर जागा ताब्यात मिळाल्यानंतर बजेटचा प्रश्न येणार

आहे. मुळात जागा स्वखुशीने मालक द्यायला तयार असेल त्यावेळेला त्यांना टी.डी.आर. मिळेल. जागा स्वखुशीने केव्हा तयार होणार? भुसंपादनासाठी रस्त्याचे पाठविले की, ते मालक येणार आणि आम्ही जागा द्यायला तयार राहणार. आम्हांला टी.डी.आर. द्या नाहीतर पैसे द्या म्हणतील. परंतु, प्रत्यक्षात जागा ताब्यात घेण्याचे प्रोसीजर जोपर्यंत आपण सुरु करायची प्रायोरिटी आपल्याकडून ठरत नाही. आपल्याकडून परत पुढे महासभेपुढे जाणार आहे आणि महासभेने मंजुरी दिल्यानंतर भुसंपादनाची कारवाई सुरु होणार आहे. भुसंपादनाची कारवाई करत असताना जे मालक स्वखुशीने द्यायला तयार होतील. टी.डी.आर. घेऊन ते ताब्यात घेऊन आपण जे म्हणता अतिक्रमण किंवा लाईन आऊट करायचे आहे ते होईल. पण जागा ताब्यात घेण्याचे प्रोसीजर सुरु व्हायला पाहिजे. मगच डेव्हलपमेंटला उपयोगाचे होईल आणि आपण म्हणता की, जे काही रस्ते झालेले आहेत ते झालेले बांधकाम विभाग आणि नगररचना विभाग वगळून काय निर्णय घ्यायचा तो आपण घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, याच्यामध्ये जे आता नाईक साहेबांनी सांगितले ती प्रोसेस सांगितली. ह्या ह्या पद्धतीने जागा घेतली जाते. हा प्रस्ताव आल्यानंतर त्यावेळेला थोडा वाद झाला होता. त्यानंतर तीन ते चार रोडवर मी स्वतः जाऊन आलो. तिकडे मातीचा भराव चालू आहे आणि तिकडे आम्हांला सांगितले गेले की, हे काम नगरपालिकेचे आहे. त्यांना मी सांगितले नाही मी नगरसेवक आहे. हे काम नगरपालिका करते. मी आपल्या बांधकाम खात्यामध्ये विचारले तेव्हा सांगितले हे टेंडर अजून काढलेले नाही. शेंडे साहेब, हा जो एक वस्तुस्थितीचा विपर्यास आहे प्रत्यक्षात तो मातीचा भराव कोण करते? जर बिल्डर करत असेल तर त्याचा पंचनामा करा की, हा पाच-पंचवीस लाखाचा भराव आहे. हा आजच्या तारखेला बिल्डर करीत आहे. नगरपालिकेकडून तुम्ही म्हणालात तेवढी प्रोसीजर आहे म्हणजे ते काम आता चालू होऊ शकत नाही. त्याची जागा आपण ताब्यात घेतली पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे प्रोसीजर सुरु करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी काय बोलतो ते ऐकून घ्या. म्हणजे आजच्या तारखेला मातीच्या भरावाचे काम चालू आहे आणि नगरपालिका ही कामे करते असे सांगतात. मला स्वतःला सांगितले. आपले बांधकाम विभाग म्हणते टेंडर काढलेले नाही. हा वाद आहे. त्याचे सॉर्ट आऊट करा. त्याच्यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांना पाठवा. हे काम कोणाचे आहे त्याची शहानिशा करा. टेन्डर जर काढलेले नसेल तर ते बिल्डर करतो की नाही ते बघा आणि टेंडर जर काढलेले असेल तर ते कसे काय काढले त्याचीपण शहानिशा करा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आता हा विषय यांनी सांगितला. पण मी आपल्याला काय सांगतो. तसा आपल्याकडे बांधकामाच्या विभागाची पण लोकं या ठिकाणी आहेत. ए.टी.पी.ची पण लोक या ठिकाणी आहेत. त्यांनी सांगावे टेंडर काढले, नाही काढले हा विषय आपल्याकडे येतच नाही. जेव्हा आपल्याकडे हा विषय आलेला आहे त्याला तुम्हांला प्रायोरिटी द्यायची. तुम्हांला प्राधान्य ठरवायचे हा विषय रस्ता केला केला आहे, नाही केला आहे त्यांचा महत्वाचा विषय आहे. त्यांच्या विषयाला मी बगल देत नाही. महत्वाचा विषय आहे. परंतु, जर हे रस्ते आपल्या माहितीप्रमाणे केलेले असतील तर दोन्ही डिपार्टमेंटने संगनमताने सर्व्हे केला असेल. दोन्ही डिपार्टमेंन्टने सांगावे हे रस्ते झालेले आहेत. हे रस्ते जोडून द्या. बाकी रस्ते असेल त्याला तुम्ही प्रायोरिटी द्या. प्राधान्य देण्याचा विषय आहे. आपला विषय संशोधनाचा आहे. आपण या विषयाचे संशोधन केले. त्याच्याशी आम्ही सहमत आहोत, नाही बोलत नाही. परंतु, जर त्या विषयामध्ये असे रस्ते झालेले असतील ते प्रायोरिटीमध्ये आपण सोडवू आणि आपण डिपार्टमेंन्टला सांगू. याची तुम्ही शहानिशा करा आणि मग तुम्ही काय ते करा आणि ज्या रस्त्यावर कामे सुरु झाली असतील त्याला तुम्ही प्राधान्य द्या. तो प्राधान्याचा तुम्ही विषय घ्या आणि दुसरा असा विषय आहे की, याच्यापुढे जर एवढे डी.पी. रस्ते आपल्याला डेव्हलप करायचे आहेत आणि मिरा भाईंदर महानगरपालिका जसे सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस ह्यांनी आपल्याला काय सांगितले कॉफर्ड मार्केट म्हणजे इन द सेन्स लोकांना बघताना लोक मुंबई महानगरपालिका बघतात आणि या मिरा भाईंदरमध्ये तसे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बजेट हे ह्यांच्या टक्क्यापर्यंतचे देखील बजेट नाही आहे. त्यांच्या एक टक्क्यापेक्षा

देखील कमी बजेट आहे. परंतु मुंबई महानगरपालिका आणि मिरा भाईंदर महानगरपालिका असा विषय जोडला जातो. म्हणून मला एकच सांगायचे आहे की, या ठिकाणी आपण स्वतः सभापती महोदय, त्यांना निर्देश द्यावेत आणि असा विषय आणावा की, ह्याच्यापुढे डी.पी. रस्ते विकसित करताना ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये त्या विकासकर्त्याचे काय शेअरींग असेल आणि आपण त्यांना कोणत्या पद्धतीने गाईडलाईन द्यायचे असतील हा विषय फार महत्त्वाचा आहे. तो विषय आपण तशा पद्धतीने घ्या की, आपले शेअरींग काय आणि त्या विकासकाचे शेअरिंग काय? आणि आपले शेअरिंग असे राहील की, आपण विकास कर्त्याला असे सांगू की, तुम्हाला हा रस्ता करण्यासाठी आम्ही परवानगी देतोय. परंतु हा रस्ता तुम्ही कोणत्या पद्धतीने विकसित केला पाहिजे. अशा पद्धतीचा निर्णय जर सभापती महोदय आपण घेतला तर हा विषय मिरा भाईंदर नगरपालिका स्थापनेपासून सुरू झालेला आहे व महानगरपालिका झाली तरी त्याचा एन्ड काही झालेला नाही. म्हणून असा विषय आला पाहिजे की, त्यात आपले शेअरींग काय राहिले पाहिजे आणि विकासकर्त्याने काय केले पाहिजे. हा महत्त्वाचा दुवा आहे कारण आता ह्या पुर्ण मिरा भाईंदर परिसरामध्ये भाईंदर पुर्व आणि भाईंदर पश्चिम आणि गावठण या ठिकाणी रस्ते होतात आणि त्याच्यावर पुन्हा आपण डांबर फिरवतो आणि पुन्हा जेव्हा एखादा रस्ता मोठा निघतो तेव्हा त्या रस्त्याचे बजेट किती तर कमीत कमी पन्नास लाख, पंचवीस लाख आणि त्याच्या वर अशा पद्धतीचे रस्ते आहे तर आपण असे निर्देश द्यावे आणि डिपार्टमेंटकडून अशी माहिती घ्यावी की, असे कोणते रस्ते आपण यापुढे विकसित केले पाहिजे. हा माझा विषय आहे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीचे अध्यक्ष साहेब, आता नाईक साहेबांनी सांगितले की, जे रिझर्व्हेशन इनव्हड आहे ते विकासकर्त्यांना आपण कळवू आणि त्यांना टी.डी.आर. देउ ते सर्व मला मान्य आहे, रस्ते बनवायला पाहिजे. परंतु माझी अशी एक शंका आहे आणि मी वेळोवेळी बोललेली आहे.जे रोड रिझर्व्हेशनमध्ये अतिक्रमण झालेले आहे, तिथे बिल्डिंग बांधून झालेले आहे. ते रोड तुम्ही कसे ताब्यात घेणार? आणि ताब्यात घेण्याच्या अगोदर विकासकर्त्यांना तुम्ही कुठल्या बेसवर टी.डी.आर देणार? कारण तिथे ऑलरेडी अतिक्रमण झालेले आहे. व आपण तिथे रोड बनवणार नाही. आपण तिथे रोड बनवूच शकत नाही कारण तिथे अतिक्रमण आहे आणि बिल्डिंग बांधून झालेले आहे. मग तुम्ही त्यांना कुठल्या पद्धतीने टी.डी.आर. देणार की, कुठला फायदा देणार? आणि जे अतिक्रमण झालेले आहे ते तुम्ही कुठल्या पद्धतीने हटविणार आणि जे अतिक्रमण झालेले आहे त्या सर्वे नंबरचा ह्याच्यामध्ये उल्लेख नाही. मग त्या सर्वे नंबरचा आणि त्या डी.पी. रोड बद्दल तुम्ही काय करणार आणि ते विकासकर्ते कोणाकडे रडायला जाणार?

**एन. आर. शेंडे :-**

मा. सभापती महोदय, पहिला प्रश्न असा होता की, आपण जी १९ रस्त्याची यादी दिलेली आहे. त्या १९ रस्त्याचे बरेचशा ठिकाणी कामे झालेली आहेत त्याच्यामुळे त्याचा समावेश करू नये असा प्रश्न होता आणि ह्याच्याबद्दल मला असे सांगायचे होते की, हे प्रायरेटी आपण ठरवतो जागा ताब्यात घेण्याच्या बाबतीत, त्याच्यातले काही रस्ते काही प्रमाणात झालेले असतील परंतु पुर्ण विड्थला काही रस्ते अजुन डेव्हलप झालेले नाही. पुर्ण विड्थ उपलब्ध झाल्याशिवाय त्या रस्त्याचे पुर्ण डेव्हलपमेंट होउ शकत नाही. काही ठिकाणी पार्टली डांबरीकरण झालेले आहे, काही ठिकाणी इलेक्ट्रीक पोलसुद्धा लावलेले असतील.

**रिटा शाह :-**

साहेब, आपणाला माझा प्रश्न समजला नाही.

**एन. आर. शेंडे :-**

त्याच्यामुळे जागा ताब्यात घेण्यासाठी प्रायोरीटी ठरवण्याचा हा विषय आहे. ज्यावेळी जागा ताब्यात घेतील आणि त्याचे काम करायचे असेल प्रत्यक्षपणे तर ज्या रस्त्याचे काम ज्याप्रमाणे झाले असेल ते एस्टीमेटमधून वगळले जाणारच. त्याच्यामुळे त्याच्यावर डबल खर्च येण्याचा प्रश्न मला वाटत नाही आणि दुसरे ह्या ज्या १९ रस्त्याची आम्ही यादी दिली, ह्याच्यात माझ्या माहितीप्रमाणे बहुतांश रस्ते अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम विरहित आहेत. त्याच्यात अतिक्रमण नाही.

**रिटा शाह :-**

साहेब तुम्ही जी यादी दिली आहे त्याच्यात नाही आहे हे मला माहित आहे. पण ज्या रोडवर खरोखर आता अतिक्रमण आहे आणि ते रोड रिझर्व्हेशनमध्ये आता आहेत. त्याचा उल्लेख तुम्ही ह्या

यादीमध्ये केलेला नाही. हे मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते. आता टी.डी.आरचा प्रश्न आला, तर माझा प्रश्न असा आहे की, आता आपण हा रोड पारित करणार पण जो प्रायव्हेट रोड आहे, प्रायव्हेट मालकाच्या ताब्यात आहे. ते आपण टी.डी.आर देउन आज ठरवणार आहोत. ते आपण ताब्यात घेणार जेव्हा बनवायचे असेल पण आपण एक ठराव पास करून घेणार तो आपण कॉमन ठराव करणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

रस्त्याच्या नावावर करणार आहोत.

**रिटा शाह :-**

रस्त्याच्या नावावर कॉमन ठराव करणार आहोत की, अमुक अमुक मालकांना किंवा कोणाला भुमालकाला आपण टी.डी.आर. देउन करायचे. पण जो प्रायव्हेट रोड आहे, त्याच्यावर ऑलरेडी बिल्डिंग बांधुन झालेली आहे. तिथे आपण रोड कशा पद्धतीने बनवणार? आणि त्यांना तुम्ही टी.डी.आर. देणार ते कुठल्या बेसवर देणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांच्याकडून माहिती आल्यावर त्याच्यावर डिस्कशन होणार आणि त्या १९ रस्त्यामध्ये अतिक्रमण नाही व काही रस्ते असे आहे की, त्याच्यावर दहा-दहा पंधरा-पंधरा वर्षापुर्वी बिल्डिंग झालेले आहे. तर तो रस्ता आला की, त्यावेळेला तुमच्या समोर चर्चेला येणार.

**रिटा शाह :-**

साहेब, दहा-पंधरा वर्षापुर्वीचे सोडा, साहेब आता काम झाले आहे व तिथे काम चालू आहे. त्याबद्दल मी नेहमी नेहमी बोलली आहे त्याच्याबद्दल मी बोलते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच्याबद्दल कोर्टात वाद चालू आहे.

**रिटा शाह :-**

कोर्टात वाद चालू आहे तर तो कोर्टाचा वाद असू द्या, त्याला निर्णय लागेल. पण मी येथे रोडबद्दल बोलत आहे. त्या रोडबद्दल तुम्ही त्या मालकांना कुठल्या बेसवर कारण तुम्ही तिथे रोड बनवु शकत नाही कारण तिथे बिल्डिंग झालेले आहे. मग जर त्या रोड रिर्झर्व्हेशनमध्ये तुमची जमीन गेली आहे. तो त्याचा टी.डी.आर. मागणारच आहे. त्याचे बेनिफिट तो मागणारच आहे. मग त्याला कुठल्या पद्धतीने आपण देणार कारण आपण तिथे रोड बनवू शकत नाही. असे अतिक्रमण आहे त्याच्यावर तुम्ही काय ठराव घेणार आहात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे निर्णय तुमच्यापुढे येणार आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, जेव्हा तुम्ही रोड बनविण्याचा विषय घेतला तर मागच्या सभेमध्ये पण आम्ही तुम्हाला बोललो की, अतिक्रमण झालेले असेल ते पण आणि नाही झालेले ते सर्व माहिती तुम्ही आमच्यापुढे आणा. नाहीतर ह्याला माझा विरोध आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, मुळचा ठराव जो आहे तो असा आहे की, मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेची अंमलबजावणी करणे. १४ मे, १९९७ रोजी ही योजना मंजुर झाली आणि १५/७/१९९७ पासुन मिरा भाईंदर नगरपालिकेचे आणि ह्या योजनेचे आरक्षण आहे की, एकूण ३८६ आरक्षणापैकी फक्त १५ आरक्षणे ही शासकीय आहेत बाकी ह्या सर्व ज्या जमिनी आहेत त्या भुसंपादित करायच्या आहेत. तर ह्याच्यामध्ये जी आरक्षणे केलेली आहेत. शहराच्या विकासाच्या माध्यमातुन त्या आरक्षणाच्या जमिनी आपल्या ताब्यात घेणे, त्याच्यासाठी अग्रक्रम ठरवणे, प्रायरिटी ठरवणे की, कुठचे रस्ते पहिल्यांदा घेतले पाहिजे कुठले मार्केट पहिले घेतले पाहिजे, कुठले मार्केट पहिले डेव्हलप केली पाहिजे. आज आपण कुठलेही डेव्हलपमेंट करण्यासाठी निर्णय घेत नाही आहे. तर आज जो निर्णय घ्यायचा आहे सभेचा मुळचा उद्देश असा आहे की, हे विषय डेव्हलपमेंट करायचे आहे त्याच्यावर अग्रक्रम ठरवायचा आहे. आज आपण ही योजना मंजुर केल्यानंतर लगेच कामाला सुरूवात होईल अशातला भाग नाही. तर ज्या ३१५ जागा आहेत. ह्या ८० चौरस किलोमीटर मध्ये ३१५ जी आरक्षणे आहेत ३८६ पैकी, ही सगळी खाजगी जागेमध्ये आहेत आणि ह्या खाजगी जागेमध्ये आरक्षण म्हणजे काय? तर असलेली ही गार्डनसाठी रिर्झर्व्हेशन, रस्त्यांचे रिर्झर्व्हेशन, हॉस्पीटलचे रिर्झर्व्हेशन, मार्केटचे रिर्झर्व्हेशन इत्यादी जी

रिर्झव्हेशन आहेत तर ती खाजगी लोकांकडे आहेत. तर खाजगी मालक आहे तो बहुतांश शेतकरी आहे. मग हे शेतकरी सहजपणे आपली जागा देतील का? जेव्हा त्यांच्या जागेतुन रस्ता जाईल किंवा संबंधित आरक्षण आपण ताब्यात घेण्याची प्रोसीजर सुरू करू त्यानंतर त्यांना आपण काय देणार आहोत? तर टी.डी.आर. देणार आहोत का? ते विकास करून आपल्याला ताब्यात देणार आहेत का? ह्या अशा बाबतची चर्चा सुरू आहे तर ह्याच्यामध्ये आपण आधी ठरवले की, आपल्याला वीस वर्षामध्ये डेव्हलपमेंटसाठी सर्व तयारी करायची आहे आणि ह्याच्यामध्ये आपण टी.डी.आर देत आहोत. त्यानंतर काही ऑकोमेडेट रिर्झव्हेशन आहेत त्याच्यामध्ये मार्केटची रिर्झव्हेशन प्रायव्हेट लॅण्डमध्ये असेल तर ती त्यांनी स्वतः डेव्हलप करायचे की, आपल्याला किती शेअर्स द्यायचा किंवा कार्पोरेशन डेव्हलप करणार असेल तर त्यांना आपण काय देउ शकतो ह्याबाबतची चर्चा आणि ह्याच्यात शासकीय जमीन हस्तांतरीत झालेली आहे आणि ताब्यात असलेले आरक्षणाचे आठ नंबर दिलेले आहे त्यापैकी आपण खेळाचे मैदान आणि इतर ह्याच्यात काही भाग विकसित झालेले आहे आणि काही अंशतः विकसित झालेले आहे आणि काही विकसनशीलमध्ये आहे. टी.डी.आर ची तरतुद देउन आपण जी ताब्यात दिलेली आहे त्याच्यापैकी हे जे पेणकर पाड्याचे आहे सर्वे नंबर आरक्षण नंबर १८९, १९० आणि १९६ ही खाजगी संस्थेच्या माध्यमातुन विकसित केलेली आहे आणि ही विकसित करण्यासाठी देणार आहोत आणि समाविशी जी आरक्षणे आहेत त्याच्यामध्ये काशीचे आरक्षण लिहिलेले आहे की, सर्वे क्रमांक ८७ चे ४ पैकी आरक्षण क्रमांक ३६७, ०.५४ हेक्टर एवढी जागा आहे. परंतु ह्या शाळेच्या ग्राउंडवर आपण लिहितो की, ते विकसित आहे. पण ती संपुर्ण जागा आपल्या ताब्यात कुठे आहे? आपण लिहितो विकसित आहे पण काशी येथे दोन्ही बाजुने जागा एनक्रोचमेंट झालेली आहे. तर ती किती आहे हे आपण स्पष्ट लिहायला पाहिजे होते. ही खरंतर आपल्याकडून थोडीशी चुक होत आहे आणि आपल्या रेकॉर्डवर हे कायमस्वरूपी राहिल ०.५४ हेक्टर आपण विकसित केले म्हणून पण आपण विकसित केलेलच नाही, शाळा बांधली आणि शाळेच्या पुढे जे ग्रांउड आहे तेवढेच ग्राउंड आपल्या ताब्यात आहे. त्याच्या बाजुला तलाठी ऑफीस आहे. व एका खाजगी मंडळाने त्या जागेवर बगीचा बांधलेला आहे, हॉल बांधलेला आहे, बाजूला मंदिर आहे. तर आपल्याकडे त्याच्यातील एकूण किती जागा आहे.

**मोहन पाटील :-**

त्याचे आरक्षण काय?

**चंद्रकांत वैती :-**

आरक्षण ३६७ आहे. शाळेचे क्रिंडागण आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही बोलल्याप्रमाणे ते प्रायव्हेट डेव्हलप केलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

प्रायव्हेट डेव्हलप केलेले आहे पण आपण ते विकसित असे लिहतोय. तो मुद्दा महत्वाचा आहे. आपल्या रेकॉर्डवर काय ०.५४ हेक्टर विकसित राहील. ती जागा खाजगी होती पण तिथे शाळा फार पुर्वीपासुनची आहे. ज्या महानगरपालिकेच्या २९ शाळा आहेत त्याच्यातल्या त्या पुर्वीच्या शाळांपैकी त्या १ उर्दु शाळा देखील त्याच्यात आहे आणि ही आरक्षण आपण करताना आज आपल्याला फक्त एवढेच ठरवायचे आहे की, आपण प्रायरीटी काय देत आहोत. प्राथमिकता कशाला देत आहोत. कारण जर शहराचा विकास करायचा असेल तर त्याचे रस्ते हे संपुर्ण जोडले गेले पाहिजे, ते मोठे झाले पाहिजे. आता काही रस्ते आपण डेव्हलप केले त्याच्यामध्ये काही शंभर फुटाचे रस्ते आहेत. जसे आझाद नगरहून नवघरकडे जाणार रस्ता आहे हा शंभर फुटाचा रस्ता आहे पण तो शंभर फुटाचा रस्ता आपण पुर्ण विकसित केलेला नाही. काही ठिकाणी बी.एस.ई.एस.चे पोल देखील आलेले आहेत. तर विकसित कराल तेव्हा तुम्ही पुर्ण रस्त्याचे डिमार्कटेशन द्या. ॲट लिस्ट पोल मारा किंवा त्याच्यावर भरणी करून घ्या. नाहीतर मग, त्याच्यामध्ये टपऱ्या लावण्याचे काम सुरू केले जात आहे आणि एकदा टपरी लागल्यानंतर मागे कापड लावले जाते. तर हे जे डी.पी. रोड आहे, आरक्षण आहेत त्याचे साधारणपणे असे असते की, सरकारी आहे म्हणून तिथे पहिले अतिक्रमण होते किंवा रस्ता झाल्यानंतर रस्त्याच्या बाजूला टपऱ्या लावण्याचे ताबडतोब उपलब्ध असलेली सोय म्हणून पाहिले जाते. तर ह्या रस्त्याचे पुर्ण डिमार्कटेशन झाले पाहिजे आणि त्यानंतर मौजे घोडबंदर सर्वे क्रमांक ९५ ते आरक्षण क्र.२९१ पर्यंत ३० मीटरचा रस्ता ग्रीन कोर्टकडे जातो. ह्याच्यामध्ये हे रस्ते होणे शहराच्या हिताने अतिशय गरजेचे आहे. कारण शहराला जोडणारा प्रमुख एकच रस्ता आहे. ह्यानंतर आज मिरा

रोडमध्ये जे बायपास रोड दिले आणि आता भाईंदर पश्चिमेला ब्रीज झाल्यानंतर थोडेसे त्याच्यामध्ये रिलॅक्सेशन आले. परंतु आपल्याला दुसरे रस्ते होणे गरजेचे आहे. जसे नवघरकडून घोडबंदरकडे जाणारा रस्ता गोल्डन नेस्टच्या मागून ज्या रस्ताकडून तो ग्रीन कोर्टकडे जाणारा रस्ता तर हे पॅरेरल रोड आहे आणि हे आरक्षण होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आपण आरक्षण करताना साधारणपणे विकासक जो असतो, तिथे जो विकासकर्ता असतो तो विकासकर्ता कुठला रस्ता वगैरे बनविण्याचे त्याची ड्युटी असते. तर असे प्लान वगैरे पास झालेले आहेत तर संबंधित विकासकर्त्याला आपण ओ.सी. देण्याच्या आधी त्यांने जो रस्ता डेव्हलप केलेला आहे की, नाही. गटर डेव्हलप केला आहे की, नाही. ह्याही गोष्टी आपण विचारात घेतल्या पाहिजे आणि हा आजचा अग्रक्रम द्यायला हरकत नसावी. ह्या विषयात अजून एक महत्त्वाचा या शहराच्या हिताची बाब राहिलेली आहे, ती राहिली या शहराच्या मध्यभागी असलेल्या टाउन हॉल. टाउन हॉलचे जे रिझर्व्हेशन आहे शिवार गार्डनच्या बाजूला त्याच्यावर फार मोठे अतिक्रमण झालेले आहे. तर ही प्रॉयरीटी ठरवून अतिक्रमण हटविण्याचे आपण आज हालचाल सुरू केली पाहिजे. कारण तिथे शाळेचा वाद आहे, इतर झोपडपट्टी वसलेली आहे आणि त्या संपुर्ण शहराचे महत्त्वाचे असे आर्कषण तिथे होईल. शिवार गार्डनच्या बाजुला फार मोठे रिर्झर्व्हेशन आहे, टाउन हॉलचे रिर्झर्व्हेशन आहे. त्या टाउन हॉलमध्ये आपल्याला काही कमर्शियल गोष्टी जसे नाटयगृह, मंगलकार्य असे कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी आपल्याला त्याच्यामध्ये करता येतील आणि ह्यासाठी ही आरक्षणे आहेत आणि आपल्याला ह्याच्यामध्ये ज्याला प्राधान्यक्रम द्यायचे आहे. तर ह्या टाउन हॉलचे देखील त्याच्यामध्ये नोंद व्हावी आणि ह्या विकास योजनेतील मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेची अंमलबजावणी करणेकामीचा विषय आज आलेला आहे. त्या विषयाचा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

ठरावाचे अनुमोदन व्हायच्या अगोदर मी ह्यात विरोध नोंदविला आहे.

**आसिफ शेख :-**

वैतीजी आपण ह्याच्यात त्रुटी काढली तर ह्याच्यावर चर्चा होउ द्या.

**चंद्रकांत वैती :-**

चर्चा करा, ठराव मी नंतर मांडतो.

**रिटा शाह :-**

एवढा मोठा विषय आणि दोन मिनिटात तुम्हाला ठराव मांडायचा आहे का?

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, विषय असा आहे ह्यांनी ठराव मांडला आणि त्या ठरावावर चर्चा होउ द्या. पण मला एकच बोलायचे आहे की, ह्या शहरामध्ये मार्केटची आवश्यकता असेल तर एक नंबर आपण मार्केटला द्या, दोन नंबर तुम्ही वीर चिमाजी स्मारकला द्या, हॉस्पीटलला जर तुम्हाला अग्रक्रम द्यायचे असेल तर हॉस्पीटलला तुम्ही अग्रक्रम द्या म्हणजे अशापद्धतीने सात ते आठ अग्रक्रम तुम्ही ठरवा आणि ते अग्रक्रम ठरवल्यानंतर तुम्ही चर्चा करा की, ह्या अग्रक्रमाला किती खर्च येणार आहे. किती कालावधी होईल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्या लोकांना नगरपालिका ही जागा घेणार आहे हे कळल्यानंतर मग ते अप्रोच होतील. त्याआधी टी.डी.आर पाहिजे की भुसंपादन हे पहिले या वर्षभराचे काम आहे. म्हणून जागा ताब्यात घेण्याचे नियोजन करण्यासाठी हे रस्ते आहेत. हे जे डी.पी. रस्ते आहे ते आपण जर अगोदरच आपण मार्कींग करून तुम्ही ठराव केल्यावर आम्ही डी.एल.आर.ला देणार आणि ते येऊन मार्कींग करणार. मार्कींग जर आताच करून ठेवले नाही तर त्यावर इनक्रोचमेंट होतील. मग एकाच रस्त्यावर जर इनक्रोचमेंट झाले तर मग ह्याही रस्त्यावर होत राहतील. म्हणून अगोदर पहिले हे करायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

म्हणून साहेब, आपण रस्त्याला पहिले प्रायोरिटी द्या व दुसरा विषय तुम्ही आरक्षणाला प्रायोरिटी द्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी बोलल्याप्रमाणे जे रस्ते डबल झालेले आहेत त्याची बांधकाम आणि नगररचना या विभागाकडून आठ दिवसात मला माहिती मिळायला पाहिजे. कारण त्याच्यावरच

आपल्याला पैसे खर्च करायचे आहे आणि दुसरा विषय म्हणजे जी पहिली प्रायोरिटी आहे तर आपल्याला पहिले हॉस्पीटल, दुसरे दोन्ही बाजुला मार्केट, तिसरे नाटयगृह हॉल, चौथे स्टेडीयम थोडे थोडे भागात पुर्ण करायचे आहे. ह्याच्यावर चर्चा करूया की, कुठचे घ्यायचे आणि कुठचे घ्यायचे नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, ह्याच्यात भाईंदर चौपाटीचा देखील विषय घ्या. चौपाटीचे काम पुर्ण झालेले नाही आपण ती फक्त गणपती विर्सजनासाठी चौपाटीचे काम केलेले आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, मी आपल्या नावावर पत्र दिलेले आहे सर्वे नंबर जुना ५०६ आणि नविन सर्वे नंबर ९३ आणि सर्वे नंबर जुना ५०७ आणि नविन सर्वे नं.९४ ते मॅटेनिटी आणि हॉस्पीटलसाठी रिर्झर्व्हेशनमध्ये त्याला प्रायोरीटीमध्ये द्या कारण आपल्याकडे टेंबा हॉस्पीटल रिर्झर्व्हेशनमध्ये आहे त्याला आपण प्रायोरिटी बेसवर घ्या. कारण टेंब्याच्या हॉस्पीटलला दहा वर्ष झालेले आहे, ताब्यात घेतोय पण अजुन पर्यंत ते आपल्याला ताब्यात मिळालेले नाही. हा सर्वे नंबर आपल्याकडे मोकळा पडलेला आहे. त्याला पहिजे आपण ताब्यात घ्या आणि तिथे डेव्हलप करा अशी मी सुचना मांडत आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, उपआयुक्त साहेब, संपुर्ण हस्तांतरीत झालेल्या आपल्याकडे ताब्यात किती आहे आणि संपुर्ण हस्तांतरीत झालेल्या आणि आपल्या ताब्यात कोणती अशी जी आरक्षणे आहेत ती आम्हाला समजली तर बरे होईल.

**एन. आर. शेंडे :-**

त्याची यादी सोबत जोडलेली आहे. सहा जे आहेत ते हस्तांतरीत झालेले आहेत आणि दोन आपल्या ताब्यात आहे, ते हस्तांतर व्हायचे आहे व मागणीचा प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा तक्ता तुम्ही दिलेला आहे आणि ते हस्तांतरीत झालेले आणि ताब्यात आलेले तर ताबा असणे निराळे आणि हस्तांतर असणे निराळे. पान नंबर काय आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

पाठीमागचा शासकीय जमिनीचा तक्ता आहे.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त साो.):-**

शासकीय जमिन हस्तांतरित झालेली व ताब्यात असलेली आरक्षणे

**मिलन म्हात्रे :-**

उल्लेख कसा का केला नाही?

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

साहेब वर लिहिले आहे. शासकीय जमिन हस्तांतरित झालेली व ताब्यात असलेली आरक्षणे.

**शरद पाटील :-**

साहेब त्याचा ऑब्लिंग केला म्हणून काही समजायला मार्ग नाही.

**एन. आर. शेंडे :-**

शेरा जो कॉलम आहे. त्यामध्ये ताब्यात कोणती? तेवढे लिहिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा तक्ता तुम्ही दिलेला आहे हस्तांतरित झालेली आहे आणि ताब्यात असलेली. ताबा असणे निराळे हस्तांतरित होणे निराळे टायटल ऑफ राईट तुमच्याकडे आहे का? नाही मग तुम्ही हे चौपाटी आणि स्टेडियम कसे काय टाकले?

**एन. आर. शेंडे :-**

ते ताब्यात आहे असे टाकले.

**मिलन म्हात्रे :-**

मग ताब्यात आहे मग निराळा तक्ता केला पाहिजे. ताबा असणे निराळे आणि तुम्हाला कोणी हॅन्ड ओव्हर करणे निराळे जमीन आसमानचा फरक आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

स्टेडियमची कलेक्टरने पार्टली ऑर्डर दिली. फुल ऑर्डर केली होती. फुल ऑर्डरप्रमाणे आम्ही ताबा घेतला. ताबा घेतल्यानंतर ऑर्डर रद्द केली आणि थोडी जागा दिली. पहिल्यांदा पूर्ण स्टेडिअमला जागा हॅन्ड ओव्हर झाली होती.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या माहितीप्रमाणे भाईंदर वेस्टची संपूर्ण जागा आपल्याला हॅन्ड ओव्हर झालेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आणि पार्टली ऑर्डर झाली.

**मिलन म्हात्रे :-**

मान्य आहे. मला सांगा तुमचे टोटल स्टेडियम किती आहे? समजा १०-१५ एकर आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

४५ एकर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

५० एकर पकडा. याच्यातील तुम्हाला किती मिळाली? ती यामध्ये दिली पाहिजे.

**मोहन पाटील :-**

त्याची काही लेटेस्ट ऑर्डर आलेली आहे.

**एन. आर. शेंडे :-**

ह्याच्यात साईड नं ९१ स्टेडिअम जे आहेत. त्याचा १८ हेक्टर रिझर्वेशनचा एरिया आहे. म्हणजे जवळपास ४५ ते ५० एकरच्या जवळपास आहे. ती संपूर्ण जागा ९४ साली कलेक्टरने आपल्याला मंजुर केलेली होती. त्या जागेच्या मालकीचा वाद झाल्यामुळे सहा महिन्याच्या आत ती ऑर्डर त्यांनी रदद केली. रद्द यासाठी केली की ओनरशिपचा वाद सुटायचा आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात रद्द केली. त्यामुळे त्याच्यानंतर ९६ साली त्या जागेची मागणी आम्ही सॉल्ट डिपार्टमेंटकडे केलेली आहे आणि जागा वादांकित ओनरशिप असल्यामुळे कलेक्टरकडे पण मागणी केलेली आहे. आता जी दहा जागेची मागणीची मी यामध्ये लिस्ट दिलेली आहे. त्याच्यामध्ये त्या जागेचा परत समावेश आहे आणि त्याच्या मोजणीचे काम सध्या सुरू आहेत. तर ओनरशिपचा डिस्पुट क्लिअर झाल्यानंतर ती जागा आपल्याला ताब्यात मिळू शकेल.

**मोहन पाटील :-**

सध्या ती जागा आपल्या ताब्यात नाही. म्हणजे आपल्या ताब्यात पझेशन लागले आहे.राईट ऑफ हे आपल्याकडे नाही आहे.

**एन. आर. शेंडे :-**

सध्या आपल्या ताब्यात आहे. परंतु आपल्या मालकीची ऑथोराईजली व्हायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय ह्याच्यामध्ये दोन हे आहेत नक्की तुमच्या ताब्यात असलेली जागा कोणती त्याच्यात ही मिक्स करु नका. आपल्याला कन्फ्युज व्हायला होते. मालकी निराळी आणि ताबा असणे निराळे ताबा म्हणजे तुमचा इतर हक्कामध्ये येणार. सात बारा उता-यावर आणि मालकी म्हणजे तुमचे स्वतःच्या भोगवट्यामध्ये येणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

साहेब काय झाले? कलेक्टर साहेबांनी अकरा हेक्टरची ऑर्डर काढली आणि आम्हाला ताबा पण दिला. ताबा दिल्यानंतर ती ऑर्डर रद्द झाली. पण आम्ही आता जी ताब्यात आहे ती आपल्या ताब्यातच ठेवलेली आहे आणि राहिलेली जागा सॉल्ट डिपार्टमेंटकडून मागितलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे किती आहे? बघा ४९ हेक्टरपैकी समजा दोन-चार किंवा १० हेक्टर जिल्हाधिका-यांनी तुम्हाला आजच्या तारखेला नावावर दिली. तर तुमची मालकी १० हेक्टर आजच्या तारखेला आहे. त्याच्यात नोंद पाहिजे आणि ताबा ३९ हेक्टरपैकी असे पाहिजे. माझा सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, सात बारा उता-यावर एन्ट्री येते. त्यानुसार तुम्ही आम्हाला माहिती दिली पाहिजे. त्यात डिटेल आले पाहिजे. डिपार्टमेंटला उद्या सर्वेअर आला त्याला हा तक्ता तुम्ही दिला तर सर्वेअर १० हेक्टर

कुठची? ही जिल्हाधिका-यांची. बाकी साठ कुठची? तुम्हाला पझेशन दिली ती. त्यामध्ये बायफर्गेशन होणार

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा़े.):-**

आणि बाकीचे सगळे करेक्शन करायचे नाही. मी सगळी मागणी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर (पूर्व) आणि भाईंदर (पश्चिम) या चौपाटीच्या जागेचेसुध्दा तुमच्याकडे हस्तांतरण झालेले असेल तर तसे लिहा. नाहीतर ताबा आहे तेवढेच लिहा. मालकीचे मिळाले नसेल तर तुम्ही त्या तक्त्यामध्ये मेन्शन करु नका.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, या ठिकाणी विकास योजनेतील प्रस्तावाची प्राधान्य यादी दिलेली आहे - १९. यामध्ये भाईंदर (पश्चिम) जो मागचा रस्ता स्टेशनसमोरुन जो जे. एच. पोद्दार असा निघून लिंकिंग रोड त्याचा यामध्ये समावेश केला आहे का? आणि तो भाईंदर ते दहिसर लिंक रोड आहे. त्याचा समावेश केला आहे का?

**मा. सभापती :-**

नाही केला.

**आसिफ शेख :-**

तुम्हाला पश्चिमेचा विकास करायचा नाही का?

**शरद पाटील :-**

सभापती महोदय सन्मा. सदस्य दिनेश नलावडे जे बोलले चौपाटीचे सुध्दा प्रथम प्राधान्य दयावे

**रिटा शाह :-**

द्यायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

भाईंदर (पश्चिम) रेल्वे समांतर पुल आरक्षण क्र. १३९ (अ) पर्यंत ३० मीटर रुंद रस्ता दहिसर लिंक रोड आणि हा पाठीमागचा स्टेशनपासून ते जे. एच. पोद्दारमार्गे टोल नाक्याला निघणार तो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा़े.):-**

ते पण घेतलेले आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

तीन नंबरला एस.टी. डेपो ते स्टेडियम पर्यंतचा रस्ता.

**मिलन म्हात्रे :-**

आरक्षण क्र. ६० घेतले पाहिजे. कारण तुम्ही तिकडून सुरुवात होते तो ड्रॉपिंग केला आहे, पूर्ण घेतलेला आहे हे महत्वाचे आहे. कारण तुमचा रस्ता एकदा क्लिअर झाला की, रिक्षा आणि हॉकर्सची आरक्षणाची स्पेस आहेत ती पण क्लिअर होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

आरक्षण क्र. ५७ ऐवजी ६० करायची.

**मिलन म्हात्रे :-**

एस.टी. डेपो पुढुन आहे हे बघा हे जे आहे इथून हा रस्ता स्टार्ट झाला पाहिजे. हा केलेला आहे हे ५७ चे टोक इकडे आले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा़े.):-**

सुरुवात ५७ पासून आहे.

**मिलन म्हात्रे** :-

कसे काय? आता हे तुमचे आरक्षण इथून ११ मीटर गेले की, इथे ३० मीटर रोड आला तिथे झाला. हा कुठून सुरू झाला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा़े.):-**

साहेब, काय म्हटलेले आहे? आरक्षण क्रमांक एस.टी. डेपोसाठी जी आरक्षणे आहेत. तिथून सुरु होणारा रस्ता आणि समाप्त कुठे होणार, आरक्षण क्रमांक ९१ ला. हे बघा ह्या आरक्षणापासून ह्या आरक्षणापर्यंत लिहिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही या ठिकाणी घराची वगैरे बिल्कुल उपमा देउ नका. मी आरक्षण क्रमांक ६० सांगतो हे त्याचा ५७ ऐवजी ६० उल्लेख करा.

**चंद्रकांत वैती :-**

आरक्षण क्रमांक मेन्शन करा

**मिलन म्हात्रे :-**

५७ डिलीट करा आणि ६० घ्या.

**रिटा शहा :-**

साहेब मी आरक्षण क्रमांक दिले. ते टेम्बा हॉस्पिटलची जागा आपल्याला दहा वर्ष झाले. ती ताब्यात आलीच नाही. ५०६, ५०७ ताब्यात घ्यायची आता दुसरा असा विषय आहे की, आता आपण आम्हाला आरक्षण दिलेले आहे ते आपण कुठल्या पध्दतीने ताब्यात घेणार आहात ते महत्वाचे आहे. त्याची पहिली चर्चा करा.

**मोहन पाटील :-**

आता सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सांगितले की भाईंदर पश्चिमेचा त्यांनी एक रस्ता प्रायोरिटी बेसीसवर सांगितला. म्हणजे भाईंदर पश्चिमेला एक प्राधान्य झाले त्याच्यानंतर भाईंदर पूर्वेचे प्राधान्य आम्ही तुम्हाला सांगितले की घोडबंदर पासून जो रस्ता येतो. चौपाटी पॅरेलल तो भाईंदर पूर्वेचा एक रस्ता तुम्ही घ्या. एक मिरा रोडचा तुम्ही रस्ता सांगा म्हणजे तीन रस्ते झाले.

**मिलन म्हात्रे :-**

मिरा रोड पश्चिम दहिसर लिंक पण घ्यावा लागेल. भाईंदर आणि मिरा रोड चार गावांना प्राधान्य दिलेले आहे.

**मोहन पाटील :-**

त्यांना प्राधान्य द्या. म्हणजे पहिले एक नंबर प्राधान्य, दोन नंबर प्राधान्य, तीन नंबर प्राधान्य, चार नंबर प्राधान्य आणि पाच नंबर असे तुम्ही प्राधान्य द्या आणि प्राधान्याने घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सा़े.):-**

सिरियल नंबरने वाचून तुम्ही सांगा.

**आसिफ शेख :-**

भाईंदर पश्चिम घ्या. दहिसर लिंक रोड.

**रिटा शाह :-**

साहेब पहिले मासळी मार्केट घ्या.

**आसिफ शेख :-**

दोन नंबरला भाईंदर पश्चिम रेल्वे समांतर उडडाणपुल ते आरक्षण क्रमांक १३९ (अ) पर्यंत ३० मीटर रुंद रस्ता म्हणजे तो दहिसर लिंक रोड तो प्राधान्याने नंबर १ आणि सिरीयल नंबर ३ आरक्षण क्रमांक ६० एस.टी. डेपो ते स्टेडियम तो दोन नंबरला.

**मिलन म्हात्रे :-**

आता आरक्षण क्र. १२२ (अ) दिला आहे तो (ड) पर्यंत झाला पाहिजे

**शरद पाटील :-**

एक नंबरला तुम्ही लिंक रोड दिला. दोन नंबरला आरक्षण क्र. ६० आणि तीन नंबरला ४, ५.

**प्र. सचिव :-**

आरक्षण क्रमांक ६० चे आले.

**मोहन पाटील :-**

त्याला तुम्ही एकच नंबर द्या. दोन्ही नंबर सलग आहेत. या रस्त्यावरुन त्या रस्त्यापर्यंत प्रायव्हेटी नंबर ३ असे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

पाटील साहेब गोल्डन नेस्टचा पण अर्धवट झालेला रस्ता आहे. तो पण पूर्ण होउ शकतो.

**मोहन पाटील :-**

तो घ्या मग.

**नितीन ठाकूर :-**

साहेब आपण आता जो गोल्डन नेस्टचा रस्ता बोलले. त्या विकासकर्त्याने तो रस्ता बनवून सुध्दा बंद केलेला आहे का? आतला रस्ता

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.):-**

पुढल्या शेतकऱ्यांनी तो बंद केला होता त्यांच्याशी चर्चा करुन संपादित केल्यानंतर आपण ती जागा ताब्यात घेउन तो रस्ता आपण स्वतः विकसित करायचा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

भूसंपादन झाले अनऑथराइज केल्याशिवाय पैसे मिळत नाहीत. भूसंपादन अधिकारी येउन कन्झुमरचा ताबा देतात

**मोहन पाटील :-**

साहेब असे नाही जेव्हा त्यांनी रस्ता बंद केला त्याला रस्त्यासाठी त्यांनी ज्या कॉम्प्लेक्समध्ये इमारती बांधल्या त्या इमारतीला आपण एफ.एस.आय. दिलेले आहे. भूसंपादित हा विषय आहेच. नाही असे बोलत नाही. पण जेंव्हा त्यांनी ४० टक्के टी.डी.आर. रस्त्याला घेतलेला आहे तर तो आपल्या मालकीचा रस्ता झाला. तो चुकीचा आहे मग ते गेट तुम्ही काढून दया

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, आता पहिले आपण या रस्त्याला प्राधान्य दिले त्याच्यानंतर आपण मार्केटसना देतो.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आता सन्मा. सदस्य नितीन ठाकूर आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले की, त्यांनी ते रस्ता मोकळा करणार की, नाही. सभापती साहेब आपण रस्ता तयार करुन द्यायचा, बिल्डरने रस्ता अडवायचा. काय करणार? तुम्ही रुलिंग दया.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब ६ नंबरचे तुम्ही सांगता आरक्षण क्रमांक ११५ ते बी.एस.ई.एस. हा रस्ता आपल्याला पूर्ण मिळेल असे मला वाटत नाही

**मा. सभापती :-**

अडथळा आम्ही काढणार.

**चंद्रकांत वैती :-**

त्याच्यात एन्क्रोचमेंट झाले असणार.

**मा. सभापती :-**

अडवले असेल तर काढणार.

**नितीन ठाकूर :-**

साहेब अडवले नाही भिंत बांधली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

तिथून पुन्हा शांती नगरची पाण्याची लाईन जाते, आरक्षण क्र. ११५ मधून.

**आसिफ शेख :-**

एवढे अर्जंट नाही आहे.

**चंद्रकांत वैती :-**

अर्जंटच आहे. कारण तो रस्ता आहे बी.एस.इ.एस.ने तिथे गेट लावलेला आहे. तो गेट काढून तो रस्ता आपल्याला वापरात आणता येईल. साहेब तो गरजेचा आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

म्हणजे ताब्यात घेण्याचा प्रश्न येणार नाही

**चंद्रकांत वैती :-**

रस्ता केलेला आहे. आणि त्याच्यामध्ये शांती नगरची पाण्याची लाईन जाते आपलीही लाइन त्याच्यामध्ये जाते आणि त्या रस्त्याच्या पूर्ण १८ मीटर रस्ताचा आहे त्याच्या बाजूला एन्क्रोचमेंट प्लिंथपर्यंत निघतात. त्याबाबत आपण योग्य ती कारवाई केली पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

म्हणजे मालकांना नोटिसा द्यायला पाहिजे

**चंद्रकांत वैती :-**

अहो ते सगळे घेण्यासारखेच रस्ते आहेत तुम्ही बघा

**असिफ शेख :-**

आता प्राधान्य सांगितले त्याप्रमाणे घ्या. नंबरिंग टाका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

हया वर्षी फक्त ताब्यात घेण्याचे काम आहे

**चंद्रकांत वैती :-**

मग त्याला रस्त्याला सेकन्ड प्रेफरन्स द्या.

**मा. सभापती :-**

थोडे थोडे घ्या. या वर्षी थोडे घ्या, दुस-या वर्षी थोडे घ्या. दिड वर्षात काही घेतले नाही या वर्षात तरी घ्या. सर्व एकत्रित काय होणार नाही.

**आसिफ शेख :-**

एका वर्षात पाच घ्या. जर सभापती साहेबांनी सांगितले

**चंद्रकांत वैती :-**

विकसित करायला अजून वेळ लागेल नंतर या विषयाची महासभेत पण चर्चा व्हायची आहे.

**आसिफ शेख :-**

आपल्याकडे आल्यावर प्राधान्यक्रम ठरवणार आहे. प्राधान्यक्रम ठरविल्यानंतर ते वाटाघाटी नंतर चर्चा करायची

**चंद्रकांत वैती :-**

हे फक्त आपल्याला ताब्यात घ्यायचे आहेत. जागा भूसंपादित करायची आहे. आपण विकास करण्यासाठी प्राधान्य देत नाही. तर सर्वच रस्ते ताब्यात घ्यायची परवानगी द्या ना. ताब्यात घ्यायचा आहे. महासभेपुढे जाणारा विषय सर्वांना प्राधान्य दयायला हरकत नाही. चुकीचे काय आहे? आणि संपूर्ण शहरातील विकास कामे आहे. त्यामध्ये सर्वांच्या वतीने मी ठराव मांडला आहे. माझे व्यक्तिशः काम याच्यात कुठे अडकले नाही आणि फक्त ताब्यात घ्यायचे प्रयोजन करायचे आहे

**शरद पाटील :-**

सगळ्या रस्त्यांना जागा ताब्यात देण्यास प्राधान्य द्याच आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे जे डबल खर्च झाले त्याचा उल्लेख करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब हा सिरीयल नंबर ६ आणि १८ एकच रस्ता आहे. त्यामुळे ती सिरीयल कमी होईल एक तर ६ किंवा १८ डिलीट होईल. त्याच्यानंतर १५, १९, ६० ह्या क्रमांकाची नोंद करुन घ्या. हे जे तीन रोड आहेत हे सर्व एकत्रच आहे. त्यामुळे तुमचे लिस्टमधील सिरीयल आपोआप कमी होतात ६ आणि १८ हा एकच आहे. याच्यातील नेमके काय आहे ते बघा आणि तो एक रोड करून घ्या

**चंद्रकांत वैती :-**

६ वेगळा रस्ता आहे. ६ किंवा ८ हा भाईंदरच्या मुख्य रस्त्यापासून बी.एस.इ.एस.कडे जातो. हे वेगळे रस्ते आहेत. तुम्ही सांगता १५ तो नवघर रोड वरून ग्रीन कोर्टच्या मागे जाणारा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

एकही रस्ता डबल नाही. वेगवेगळे रस्ते आहेत.

**आसिफ शेख :-**

१९ रस्त्याची यादी आलेली आहे त्यापैकी १६, १७, १८, १९ हे ऑलरेडी झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे नंबर कमी होत जातील.

**चंद्रकांत वैती :-**

ते ताब्यात घ्यायचे आहेत आपल्याला.

**शरद पाटील :-**

याच्यात फक्त जागा ताब्यात घ्यायची आहे. फक्त त्याच्यावर कामे करायची नाही. विकास करायला वेळ जाणार आहे.

**असिफ शेख :-**

झालेले रस्ते आहेत.

**शरद पाटील :-**

झालेले वगळून घ्या.  सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी जे सांगितले झालेले रस्ते वगळून म्हणजे दुसरी बाकी ज्या जागा हस्तांतरित करायच्या आहेत.  त्याला परवानगी देउन टाका.

**चंद्रकांत वैती :-**

एकूण ३८६ आरक्षणे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा माझा काय तुम्हाला हट्ट नाही आहे की, जे मी सांगतो ते मान्य करा.  जी लिस्ट दिलेली आहे.  हे जे लिस्टचे प्रस्ताव दिलेले आहेत.  त्याचे जरा एकत्र बसून परत एकदा विचार करा. ह्याच्यामध्ये आम्ही जो स्टडी केला आहे.  त्यामध्ये काही हे मी डबल बोलतो म्हणजे ते आहेताच. तुमच्या प्रशासनाने आम्हाला लेखी द्यावे हे डबल नाही आहे.  तुम्ही उगाच ठणकावून सांगू नका.  मी लेखी पत्र दिले आहे.  मला तुम्ही लेखी उत्तर द्या.  मी तुम्हाला पत्र दिलेले आहे माझी एकच सुचना आहे.  डबल जर झाला नसेल तर ठिक आहे आणि असेल डबल तर दुसरे कुठेतरी प्रस्तावित करु शकतो.  यामध्ये चार पाच ॲड करु शकतो.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे.  आता आपली रस्त्यावर चर्चा झाली या ठिकाणी एकोणीस रस्ते आहेत.  मिरा भाईंदरमध्ये आणखी बरेच रस्ते आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब भाईंदरमध्ये कोणताही डबल झालेला रस्ता नाही आहे. नवघरला बरेच अप्रोच रोड काशिमिरा हायवेवरून गेलेले आहेत.  त्याचा अंतर्भाव यामध्ये करण्यात आलेला आहे.  त्यामुळे आपणास वाटत असेल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जे म्हणता मी तुम्हाला आरक्षण नंबर मेन्शन करतो आहे. तुम्ही म्हणता गावानुसार मी बोलत नाही.  नवघर फार मोठी तलाठी सजा आहे त्याचा एरिया मोठा आहे.  मी आरक्षण नंबर सांगतो आणि त्याची स्टार्ट आणि एन्ड आता मी तुम्हाला माझ्या वॉर्ड मधील सांगितले आहे.  ५७ नंबर देण्याची काही गरज नव्हती.  ६० नंबर का दिला नाही?  पोलिस स्टेशन ते भाईंदर हा रस्ता स्टेशन रस्त्यापासून सुरु होतो अशा चुका झालेल्या आहेत असे नाही आहे.  मी नावानुसार सांगत नाही.  जे तुम्ही आरक्षण नंबर टाकले त्या आरक्षण नंबरनुसार सांगतो आहे.  भाईंदर पोलिस स्टेशनपासून रेल्वे स्टेशना जोणारा एक रस्ता, रेल्वे स्टेशन ते भाईंदर पोलिस स्टेशनला येणारा हा दुसरा रस्ता असे आहे. नवघर, गोडदेव, काशीमीरा वगैरे काही घेऊ नका.  मी बोललो त्याचा विचार करा.  अन्यथा करु नका.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

आपण जे सांगितले ते ५७ चे ६० केले आहे.

**आसिफ शेख :-**

ताबडतोब टी.डी.आर. देणार का?

**मिलन म्हात्रे :-**

लगेच टी.डी.आर. देउन टाका.

**रिटा शाह :-**

रस्त्याच्या आरक्षणाबददल जो प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे त्या सर्व प्रस्तावाला जसा अग्रक्रम निश्चित केला आहे त्यासर्व रस्त्यांना बनवण्याबाबत आणि ताब्यात घेण्याबाबत मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

आता आम्ही प्राधान्यक्रम ठरविला आहे.  त्याला मंजुरी देउन टाकतो.  नंतर त्यांना ताबडतोब टी.डी.आर. देणार का?

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये आजच्या तारखेला जी प्रोसिजर आहे. काम झालेले आहे त्याची तुम्ही व्हिडीओ शुटिंग घ्या. फोटोग्राफ घ्या. तुमच्या रेकॉर्डला ते असु द्या. १८ मीटरचा रस्ता ९ मीटर पूर्ण झाला ९ मीटर बाकी आहे. जसे आपल्या दाबामधील आपण २० मीटर ओपन केला, २५ मीटर बाकी आहे. ६० मीटरचा रस्ता आहे. याचा उल्लेख यामध्ये करुन घ्या. तो केला गेला पाहिजे. ज्यावेळेला तुमचे डिस्प्युट क्लोज होइल. त्यावेळेला तुम्ही मंजुरी दिली असणार.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.):-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, बांधकाम विभागाचे सर्व अधिकारीही येथे उपस्थित आहेत. या प्रत्येक रस्त्याची हिस्ट्रीशीट तयार करण्यात यावी. आणि हिस्ट्रीशीट लवकरात लवकर करुन पुढल्या सभेच्या किंवा १५ दिवसाच्या आत ती सादर करावी. त्या हिस्ट्रीची आजची स्थिती काय आहे? माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला माहिती असेल सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले. ब-याच विकास कर्त्यांनी अनेक रस्ते विकास आराखडयातील पूर्ण केले. कनकिया बिल्डरचा उल्लेख झाला. कनाकिया बिल्डरने बेवरली पार्क डेव्हलप करताना रस्ता केलेले आहे. गोल्डन नेस्टचा रस्ता ब-याच प्रमाणात पूर्ण झालेला आहे. प्लेझंट पार्कचा रस्ता झालेला आहे. ते वगळून या ठिकाणी आपली हिस्ट्रीशीट तयार असेल तर आपल्याला कळेल की, अमुक किलोमिटरपर्यंतचा रस्ता पूर्ण करण्यात आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यातील रवि ग्रुपनेसुध्दा दोन-तीन रस्ते केले आहे

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता रस्त्याने झाल्यानंतर दुसरे प्राधान्य मार्केटला आहे.

**रिटा शाह :-**

साहेब मी ठराव मांडलेला आहे. त्याच्यामध्ये फक्त तेवढे इन्क्लुड करा की जे झालेले रस्ते आहेत त्याला वगळून जे रस्ते आमच्यासमोर ठेवलेले आहेत प्रस्तावित केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कमिट्या वगैरे नेमता का?

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जो ठराव मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

साहेब आता जे दुसरे वाक्य आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपआयुक्त शिवमुर्ती नाईक यांच्या नेतृत्वाखाली एक कमिटी नेमून टाका का हो पळाले का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

जे प्राधान्य दिले त्यात आपण दुसरे प्राधान्य मार्केटला दिले बरोबर आहे ना.

**आसिफ शेख :-**

आता रस्त्याचे चालू आहे. मार्केटचे बाकी आहे. आता आरक्षणाचे चालू होईल रस्त्याचे एक चॅप्टर क्लोज झाले.

**मोहन पाटील :-**

वीर चीमाजी आप्पाला तुम्ही पहिला नंबर दया दुसरे मार्केटला घ्या कुठल्या मार्केटला तुम्ही पहिले प्राधान्य द्याल. भाईंदर इस्ट आणि भाईंदर वेस्ट या ठिकाणी रस्त्यावर जो लोकांना हॉकर्सचा त्रास होतो. तो कमी होउन जाईल आणि एक रेव्हेन्यु मिरा भाईंदर महानगरपालिकेला चांगला मिळेल. म्हणून प्रामुख्याने जे दोन भाईंदर ईस्ट आणि भाईंदर वेस्टला रिझर्वेशन जे आहेत आणि आता आपण जे रिझर्वेशनला प्राधान्य मागतो. तर आपल्या समोर एक असा मोठा प्रश्न आहे की, ते मागताना खाजगी जागा आहेत. तर खाजगी जागा असताना खाजगी जागेला किती पैसे मोजावे लागतील हा एक विषय किंवा ती पार्टी आपल्याला टी.डी.आर.ला भुसंपादन करुन देईल का? हे दोन विषय यामध्ये मोडतात. म्हणून तो पहिला विषय घ्या की मार्केट.

**चंद्रकांत वैती :-**

मार्केटमध्ये ती खाजण जमीन आहे ती सरकारी जागा आहे त्या पहिल्या ताब्यात घ्या. सरकारी जागा सर्वच घ्या.

**रिटा शाह :-**

ताब्यात तर घ्यायचेच ताब्यात घेतल्याशिवाय आरक्षण कसे घेणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण मार्केटमध्ये जसा आपण कत्तलखाना घेतलेला आहे. त्या कत्तलखान्यातून संपूर्ण मिरा भाईंदरला ते मांस पुरविणार आहेत. तसेच मी सांगतो की, एक तुम्ही होलसेल मार्केट भाईंदरमध्ये मच्छिचे घ्या.

**शरद पाटील :-**

आपण कसले मार्केट घेणार आहोत?

**रिटा शाह :-**

फीश मार्केट व्हेजीटेबल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी होलसेल मार्केट म्हणतो जसे कत्तलखाना आहे. जसे क्रॉफर्ड मार्केट आहे.

**शरद पाटील :-**

पण त्यामध्ये होलसेल आणि रिटेल दोन्ही होणार.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नुसते हातावर विकतात ते मच्छि मार्केटमध्ये आले सकाळी भाईंदरला येतात ते होलसेल मार्केट झाले.

**मोहन पाटील :-**

साहेब ती जागा आपल्या ताब्यात नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ती जागा आपल्या ताब्यात नाही. पण दुसरे आरक्षण आहे त्यामध्ये बनवा. जर आपण मार्केट बनविले तर ते येतील

**मोहन पाटील :-**

आपला विषय झाला. चांगला विषय होता. दुसरा विषय चौपाटीचा घ्या. भाईंदर वेस्टची चौपाटी आपल्याकडे सुरु आहे. जागा हस्तांतरित झालेली आहे. भाईंदर पुर्व चौपाटीचे काम सुरु करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मार्केटचे नुसते बोलू नका. सिरीयल नंबर सांगा.

**नितीन ठाकूर :-**

भाईंदर पश्चिमच्या चौपाटीला एक करोड रूपये आमदार खासदारांकडून मिळाले का? त्यातील ५० लाख वेस्टला डायव्हर्ट करा.

**चंद्रकांत वैती :-**

मार्केट सगळे घ्या. त्यातील बरेचसे मार्केट सरकारी जागेवर आहेत. त्याचा कब्जा तर घ्या. संपूर्ण ही यादी दिली ती घ्यायला काय हरकत आहे. आपल्याला ताब्यातच घ्यायची आहे. त्याचा विकास नंतर होईल.

**मिलन म्हात्रे :-**

हे जे म्हणतात विकली मार्केट ६८ ब, विकली मार्केट भाईंदर ७५४ सर्वे नंबर ह्याच्यामध्ये आले आहे आणि तीन नंबर भाईंदर पूर्वे चौपाटीला घ्या.

**आसिफ शेख :-**

त्याच्यानंतर स्टेडियमची जी जागा आपल्याला ताब्यात घ्यायची आहे. तर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपल्याला निधी उपलब्ध होत नाही. पुन्हा जे फन्ड आपल्याला राज्य सरकारकडून मिळतात. ते पण त्यामुळे स्टेडियमची जागा आहे ती पण घ्यायला पाहिजे. त्याच्यानंतर जनार्दन रकवी मार्ग आहे, प्राधान्य क्रम सांगतो. मार्केट, स्टेडियम, नाट्यगृह.

**मोहन पाटील :-**

ज्या जागा रिझर्वेशनमध्ये दाखविलेल्या आहेत त्या जागांना आपल्याला पैसे द्यावे लागणार नाहीत. प्रश्न येतच नाही. मग ते घ्या. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यानी आपल्याला सांगितले की, ज्या जागा रिझर्वेशनमध्ये आहेत त्या सर्व जागा तुम्ही घ्या. कारण ज्या ठिकाणी आरक्षण सरकारी जागेमध्ये असेल त्या ठिकाणी पैसे द्यावे लागणार नाहीत.

**रिटा शाह :-**

एक नंबर स्मारकाला दिलेले आहे, दोन नंबर मार्केट, तीन नंबर हॉस्पिटल, चार नंबर पूर्व व पश्चिम चौपाटी, पाच नंबर गार्डन.

**मोहन पाटील :-**

पाच नंबरला शिवार गार्डन.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब नाट्यगृह किती नंबरला आहे

**चंद्रकांत वैती :-**

टाउन हॉल

**नितीन ठाकूर :-**

किती नंबरला

**चंद्रकांत वैती :-**

शिवार गार्डनजवळचा प्रायोरिटीमध्ये.

**रिटा शाह :-**

गार्डन आपल्याकडे जेवढे आरक्षित आहेत. त्याच्यामध्ये तुम्ही प्रॉयॉरिटी द्या. साहेब याच्यामध्ये काही जागा सरकारी आहेत आणि काही मालकीची जागा आहे तर आपल्याला आज हे ठरवावे लागेल की, मालकीची जागा आहे ती तुम्ही कुठल्या बेसवर ताब्यात घेणार? जी जमिन प्रायव्हेट मालकीची आहे ती तुम्ही कुठल्या पध्दतीने ताब्यात घेणार आहे?

**एन. आर. शेंडे :-**

खाजगी जागेवर आरक्षण असते ते एकतर आपल्याला एक्वीझीशन करायला पाहिजे पैसे देउन लॅन्ड एक्वीझीशन ॲक्टखाली आणि एक्वीझीशन करताना पैसे द्यायला पाहिजेत.

**रिटा शहा :-**

सभापती साहेब, माझा एक विषय आहे की, मागे जनरल बॉडीला पण मी पत्र सादर केलेले आहे. आता सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी सांगितले, शिवार गार्डन जवळचे टाऊन हॉल वगैरे ते आहे. त्या बिल्डरने मालकीची जमीन आहे. त्यांनी तुमच्याकडे पत्रही सादर केलेले आहे. त्यांना पद्धती माहिती नाही की, कुठल्या पद्धतीने आपल्या स्वतः बांधून घ्यायचे आहे. तर टाऊन हॉल आणि त्यांचे पत्रही मी इच्छा दर्शविली आहे की, मी स्वतः करतो, स्वतः बांधतो. तर आजच्या सभेत त्यांनी कुठल्या पद्धतीने जायचे ते पास करुन घ्या. तो स्वतःच ते करायला तयार आहे. तुम्हांला पत्र दिलेले होते.

**मोहन पाटील :-**

म्हणजे बी.ओ.टी. तत्वावर ते स्वतः करीत असतील ते दोन आहेत. एकदम डायरेक्ट करतील ते वेगळा आणि त्याची स्वतःची जागा आहे. सन्मा. सदस्या रिटा शहा यांचे म्हणणे बरोबर आहे. तर त्याला आपण टर्म कन्डिशन कोणत्या पद्धतीने ठेवणार?

**रिटा शहा :-**

ते आज ठरवून महासभेत घ्या अशी माझी विनंती आहे. त्यांनी तुमच्याकडे इच्छा दर्शविली आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आता या ठिकाणी जे आरक्षण, प्राधान्य क्रमांक आपण दिले आहेत आणि मॅडमने प्रश्न काढला की, आपल्याला ज्या पद्धतीने बांधा आणि वापरा तत्वावर असतील. त्याच्यावर विस्तृत चर्चा पुढे महासभेला येईपर्यंत एकदा तो विषय तुम्ही आणा.

**रिटा शहा :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील जे बोलतात ते मिसगाईड करतात. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. कारण तुम्ही आम्हांला प्रोसीडींगमध्ये डिक्लेअर केले आहे की, मालक स्वतः हे ते तुम्ही आम्हांला विवरण दिलेले आहे. मग आता पुढच्या सभेला ती चर्चा कशाला पाहिजे. तुम्ही आम्हांला चर्चा करायला प्रासीडिंगमध्ये दिलेले आहे. मग त्याच्यावर तुम्ही पहिली चर्चा करा. तुम्ही नुसता अग्रक्रम करता. मग अग्रक्रम ठरवून तुम्ही काय करणार?

**मोहन पाटील :-**

साहेब, अग्रक्रम झाले.

**रिटा शहा :-**

तुम्ही आम्हांला डिटेल दिलेले आहे की, कुठल्या पद्धतीने आम्ही ते हस्तांतरित ताब्यात घेऊ ते तुम्ही आमच्याकडे दिलेले आहे. त्याच्यामधून आम्हांला एक नक्की करुन तुम्हांला द्यायचे आहे. त्या हिशेबाने तुम्ही ताब्यात घेणार. जर आम्ही तुम्हांला नक्की करुनच दिले नाही तर तुम्ही काय ताब्यात घेणार आहे?

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आता आपण अग्रक्रम दिल्यानंतर पुढची कारवाई काय? ते स्पष्ट सांगा.

**मा. सभापती :-**

ज्याची जागा मार्केटमध्ये असेल किंवा ज्याची जागा हॉलमध्ये असेल तर आपण त्या मालकाला हॉल बांधण्याची परवानगी देऊ. त्याला सांगू खालचा भाग दुकानास. तो निर्णय महासभा घेईल. आपण महासभेमध्ये ठेवू आणि वरचा आपल्याला त्यांनी करुन द्यावे.

**रिटा शहा :-**

त्यांनी पत्र टाकलेले आहे. आजच्या मिटींगमध्ये त्यांना ते स्वतः बांधायचे आहे. मी कमिशनर साहेबांना पण जाऊन भेटले. तुम्हांला सुद्धा येऊन भेटले.

**एन. आर. शेंडे :-**

सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव सबमिट करायला सांगितला.

**रिटा शहा :-**

माझी अशी एक सुचना आहे की, इथे हे करुन तुम्ही ते महासभेत घ्या. तुमचे एक आरक्षण क्लिअर होते ना.

**मोहन पाटील :-**

हा विषय महासभेत येईल.

**एन. आर. शेंडे :-**

आपली चर्चा झाली त्यावेळी मी सांगितले होते. सगळ्या कागदपत्रांसह त्यांनी प्रस्ताव दाखल करायला पाहिजे.

**रिटा शहा :-**

साहेब दाखल केला आहे.

**एन. आर. शेंडे :-**

नकाशा वगैरे कुठे दिला आहे?

**रिटा शहा :-**

सात-बारा नकाशे पण टाकले आहे. मी तुम्हाला कॉपी देते.

**एन. आर. शेंडे :-**

यु.एल.सी.चे कागदपत्र हे सगळे जोडावे लागेल.

**रिटा शहा :-**

यु.एल.सी.चे टाकले आहेत. मागे जेव्हा मी फाईल काढायला आली तेव्हा तुमच्या कार्यालयामध्ये फाईल मिळत नव्हती.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी जो सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी ठराव मांडलेला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे. पुढचा विषय घ्या. पुढचा विषय घेण्यापुर्वी सभापती महोदय, एक नवीन प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे. थोडे पाच मिनिट हा विषय टर्न होतो आहे.

**रिटा शहा :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी ठराव मांडला आहे. तो वाचून दाखवा. ठरावामध्ये काय शब्द टाकले ते वाचा. रस्त्याचे झाले पण आरक्षणाचा काय ठराव मांडला ते सांगा.

**चंद्रकांत वैती :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेची जी अंमलबजावणी करायची आहे. मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टी.पी.एस.१२९६/८४७/सी.आर.१६२/९६/यु.डी.१२, दिनांक १४/५/१९९७ अन्वये मंजुर झालेली असून ती दिनांक १५/७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. तर ह्या मंजुर विकास योजना आहेत. या विकास योजनेची आपल्याला ८० चौ.कि.मी. क्षेत्र असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ३८६ आरक्षणातील १५ आरक्षणे ही सरकारी जागेवरची आहेत आणि महापालिकेच्या ताब्यात आहेत. उर्वरित जागा या सॉल्ट डिपार्टमेन्टच्या व खाजगी मालकांच्या असून त्या आपण आरक्षण भुसंपादित करण्याची कामे आता जो सभागृहाने प्राधान्यक्रम दिला आहे तो प्राधान्यक्रम ठरवून शहराच्या विकास योजनेची मंजुरीची अंमलबजावणी सुरु करावी असा मी ठराव मांडला होता. सदस्यांनी नांवे दिली, अग्रक्रम ठरविला, त्याला प्राधान्य द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

पत्राचे काय? पत्र दिले सुचनांचे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पत्राचे केले. ५७ ऐवजी ६० केले.

**आसिफ शेख :-**

ज्या सन्मा. सदस्यांनी सुचना केलेल्या आहेत. त्या सुचना व सुधारणांसह स्विकारुन अनुमोदन.

**प्रकरण क्र. २१७ :-**

आरक्षणातील जागा विकसित करणेकामी अग्रक्रम ठरविणेबाबत विचार विनिमय करणे.

(दि. २२/०१/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २१४)

**ठराव क्र. १९८ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना दि. १४/५/९७ रोजी मंजूर झाली असून दि. १५/७/९७ पासून अंमलात आलेली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/८/२००० रोजी मंजूर झाली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

शहरासाठी मंजूर असलेल्या विकास योजनेची अमलबजावणी नियोजन प्राधिकरणास म्हणजेच मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ अन्वेय करणे बंधकारक आहे.

मंजूर विकास योजनेत समाविष्ट असलेले आरक्षणे व विकसीत करावयाचे आरक्षणे याबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे. विकास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात आवश्यक निधीची तरतूद करणे आवश्यक असल्याने प्रथमतः विकास योजना अंमलबजावणीसाठी प्राधान्यक्रम ठरविणे आवश्यक आहे. सदर प्राधान्यक्रमयादी टिपणीसह प्रशासनाने सादर केलेली आहे. प्राधान्य यादी मध्ये रस्ते, प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान, बगीचा दुकान केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र इ. इतर एकूण ९२ आरक्षणे व १९ विकास योजनेतील रस्ते यादीत सामाविष्ठ आहेत. टिपणीसह सादर केलेल्या रस्ते आरक्षणाबाबत स्थायी समितीच्या सदस्याची चर्चा होऊन विकास योजना अंमलबजावणीसाठी विकास योजनेतील एकूण १७ रस्ते खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

**<u>विकास योजनेतील रस्त्याची यादी.</u>**

१. आरक्षण क्र. ९७ पासून जनार्दन रकवी मार्गापर्यंत १८.०० मी.रुंद रस्ता.
२. भाईंदर (प) रेल्वे समांतर उड्डाणपूल ते आरक्षण क्र. १३९ अ पर्यंत ३०.०० मी. रुंद रस्ता.
३. आरक्षण क्र. ५७ (एस.टी.डेपो) ते स्टेडियम (आरक्षण क्र.९१) पर्यंतचा ३० मी.रुंद रस्ता.
४. आरक्षण क्र. १२२ अ (चौपाटी) लगतचा १८ मी. रुंद रस्ता.
५. मौजे नवघर तलावापासून एक्सप्रेस हायवे जोडणारा ३० मी. रुंद रस्ता.
६. आरक्षण क्र. ११५ ते बी.एस्.ई.एस्. (आरक्षण क्र. २९२) पर्यंतचा १८ मी. रुंद रस्ता.
७. आरक्षण क्र. २१३ ते हायवे पर्यंतचा रुंद रस्ता.
८. काशिमिरा ररस्त्यापासून मिरा गावठाण ते हायवे पर्यंत जाणारा (प्लेझेंट पार्क) ३० मी.रुंद रस्ता.

९. रॉयल कॉलेज ते मिरा औद्योगिक वसाहत पर्यंतचा ३० मी.रुंद रस्ता.
१०.काशिमिरा रस्त्याकडून वसुंधरा इमारतीपर्यंत जाणारा १८ मी. रुंद रस्ता.
११.आ.क्र. १२२ ( खेळाचे मैदान) ते ३० मी. रुंद पुर्व - पश्चिम मौजे नवघर (स.क्र.२०४) पर्यंतचा विकास योजना रस्ता (न्यु गोल्डन नेस्ट रोड).
१२.स.क्र.३५९ मौजे गोडदेव ते स.क्र. २४३ मौजे नवघर पर्यंतचा १८ मी.रुंद विकास योजना रस्ता.
१३.स.क्र.३६८ मौजे गोडदेव ते स.क्र. २५४ मौजे नवघर पर्यंतचा १८ मी.रुंद विकास योजना रस्ता.
१४.आ.क्र. २६३ ते आ.क्र. २४७ पर्यंतचा ३० मी. रुंद वि. यो. रस्ता.(कनाकिया बेवर्लीपार्क रोड).
१५.स.क्र. ४६९ मौजे नवघर ते स.क्र. २९२ पर्यंतचा १८ मी.रुंद विकास योजना रस्ता.
१६.स.क्र. ४६७ मौजे नवघर ते स.क्र. २७५ व २७६ पर्यंतचा १८ मी.रुंद विकास योजना रस्ता.
१७.मौजे घोडबंदर स.क्र. ९५ ते आ.क्र. २९१ पर्यंतचा ३० मी. रुंद वि.यो. रस्ता. (ग्रीन कोर्ट क्लब समोरील रस्ता).

वरील विकास योजना रस्त्याची अंमलबजावणी करताना यापूर्वी काही प्रमाणात रस्त्याचे बांधकाम नगरपरिषद/ महानगरपालिका विकासक यांचेकडून झाली असल्यास रस्त्याचे बांधकाम करताना अंदाजपत्रात त्याबाबत योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी.

मंजूर विकास योजनेतील आरक्षणे विकसित करण्यासाठी नियमावलीतल्या सामावेशक आरक्षणाच्या तरतूदी प्रमाणे विकसित करणे, विकास हक्क हस्तांतरण तरतूदीनुसार विकास हक्क प्रमाणपत्र देऊन जागा ताब्यात घेणे व या दोन्ही पर्यायानुसार जागा ताब्यात घेणे शक्य नसल्यास भूसंपादन अधिनियमानुसार भूसंपादन करुन आरक्षणा खालील जागा ताब्यात घेता येतील. सर्वच्या सर्व ९२ आरक्षणे एकाच वर्षात जागा ताब्यात घेउन विकसित करणे शक्य नसल्याने सदस्यानी या विषयावर चर्चा करुन व सुचना करुन सदर आरक्षणे विकसित करण्यासाठी प्राधान्यक्रम खालील प्रमाणे सुचवीले आहे.

१. हॉस्पीटल
२. भाईंदर पुर्व व पश्चिम चौपटी विकास करणे.
३. मार्केट.
४. स्मशान भूमी, दफन भूमी, दहन भूमी इ.
५. शिवार गार्डन, टाऊन हॉल व ड्रामा थियटर
६. मुनिसिपल ऑफीस पार्कींग, खेळाचे मैदान
७. कत्तलखाना.
८. स्टेडीयम आ.क्र. ९१.
९. अग्निशमन कार्यालय आ.क्र. १३२.
१०.स्पेस फॉर हॉकर्स, रिक्षा पार्किंग इ.

या शिवाय शासकिय जागेवरील आरक्षणे मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे चालू आहे. या जागा हस्तातरण करुन घेऊन सदरची आरक्षणे विकसीत करुन घ्यावीत.

वरील प्रमाणे सुचवलेल्या प्राधान्यक्रमाच्या अनुषंगाना उपलब्ध अंदाजपत्रकिय तरतूद तसेच प्रथमतः नियमावलीनुसार सामावेशक आरक्षण, विकास हक्क इ. बाबत आरक्षणे ताब्यात घेणे व विकसित करणे इ. बाबत मा. आयुक्त स्तरावर सर्व कार्यवाही करुन नियमावलीनुसार आरक्षणे विकसित करणे व विकास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपययोजना तरतूद व कार्यवाही करण्यास स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१८ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

साहेब, विषयांतर सुरु होते. या ठिकाणी असा विषय आलेला आहे की, आचारसंहिता लागण्यापुर्वी उड्डाणपुलाच्या उद्घाटनाला वेळ होतो. तर असा प्रस्ताव आला की, त्या भागातील सन्मा. नगरसेवक रोहिदास पाटील, ग्रेटा फॅरो आणि स्टिवन मेंन्डोसा यांच्या वॉर्डामध्ये जो ब्रिज आहे. त्या ब्रिजचे ते उद्घाटन करणार आहेत आणि अशा पद्धतीने पत्रिका काढणार आहेत. तर ते खरे आहे की, खोटे आहे त्याचा जरा तपास लावून घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

अतिशय प्रतिष्ठेचा असा ब्रिज आहे आणि त्याची ती पत्रिका आली आहे. याबाबत उपआयुक्तांनी माहिती घ्यावी.

**शरद पाटील :-**

पण ते ब्रिजचे कुठे आहे?

**मोहन पाटील :-**

अशा पद्धतीने ब्रिजचे उद्घाटन करण्यांत आलेले आहे. असा प्रस्ताव दिलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात असतांना या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेने उद्घाटन लावायला पाहिजे. अशी उद्घाटने तुम्ही लावत गेले तर त्या ब्रिजचे उद्घाटन असे लावू.

**शरद पाटील :-**

ते काम नगरसेवक निधीमधील आहे. त्यांनी नवीन रिपेरिंग काम केले आहे.

**मोहन पाटील :-**

त्याचे चार वेळा उद्घाटन झाले.

**रिटा शहा :-**

मागे त्याबद्दल आपली चर्चा झाली होती. नगरपालिकेने करायचे हे पत्र वगैरे त्यांनी काढायचे.

**चंद्रकांत वैती :-**

उद्घाटनाच्या बाबतीत एक स्थायी समितीमध्ये पॉलिसी डिसीजन झाले होते. त्यामध्ये संबंधित महापालिका अशी पत्र काढणार आहे. तर संबंधित नगरसेवकांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन या विषयावर त्यांना समज देऊ.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, नगरभवन जे आहे तर सन्मा. सदस्य आसिफ शेख, मी आणि सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा आमचा नगरसेवक निधी वापरुन रंगरंगोटी करतो, डागडुजी करतो. आम्ही पाटी लावून ओपनिंग करु तर असे चालेल का? समाजमंदिर नगरपालिकेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसेवक निधीमधून जो खर्च झाला आहे तो.

**चंद्रकांत वैती :-**

या संदर्भात महापालिका धोरण ठरवेल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब आणि उपस्थित सन्मा. सदस्य गेल्या सभेमध्ये मी अत्यंत निर्णायक असा खुलासा यामध्ये केला होता. नगरसेवक निधी म्हणजे मी त्यावेळी ही सांगितले होते आणि आता पुन्हाही सांगतो. नगरसेवक निधी म्हणजे नगरसेवकांचा वैयक्तिक असा निधी समाजायचा नाही. लोकोपयोगी कामासाठी शासनाकडून किंवा महानगरपालिकेकडून नगरसेवकांना, लोकप्रतिनिधींना, आमदारांना लोकोपयोगी कामासाठी खासदारांनासुद्धा हा पैसा त्याच्या मतदार संघामध्ये काम करण्यासाठी देण्यांत येत असतो. याचा अर्थ हा नाही की, हा माझा वैयक्तिक आहे आणि याच्यावर वैयक्तिकरित्या त्यांच्यावर दावा करायचा हे त्याला संयुक्तिक होणार नाही.

**शरद पाटील :-**

वैयक्तिकरित्या वॉर्डात जी आहे त्यांची नांवे ती टाकतात.

**मोहन पाटील :-**

तुमचा विषय बरोबर आहे. तुम्ही नांव टाका. त्यांनी पालिकेच्या मालमत्तेवर नगरभवनवर या तीन नगरसेवकांनी रंगरंगोटी नगरसेवक फंडातून केली. म्हणून ते पाटी लावून उद्घाटन करतील का? असे मला बोलायचे आहे. तो विषय आहे. म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेने ते उद्घाटन करावे. नगरसेवकांनी नांवे टाकावी, ज्यांचा फंड आहे त्यांची. त्या पुढे प्रश्न येत नाही. तो विषय आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मला वाटते आपल्या सभेनंतर याची विशेष चर्चा करा.

**मिलन म्हात्रे :-**

सभा चालू असतांना जे नोंद केले आहे. हा आता एक नवीन वाद उत्पन्न झाला आहे. परंतु, ही बाब गांभीर्याने घ्या. हाच मुद्दा सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनासुद्धा लागू होतो. कारण पहिल्या माळ्यावरची इमारती ही महापालिकेची इमारत आहे. प्रशासकीय कालावधीमध्ये त्याला खर्च झाला. पहिला माळा हा महापालिकेच्या मालकीचा आहे. फक्त नुतनीकरण वगैरे हे सगळे नगरपालिकेने केले. वॉर्डचे नगरसेवक म्हणून त्यांची तीन नांवे खाली आली. त्यांनी हँड बिले काढली. त्यांचे हँड बिल माझ्या घरी आले आहे. अशी एक महापालिकेची आमंत्रण पत्रिकासुद्धा निघाली आहे. हा त्यांच्यासुद्धा नावाचा तिकडे उल्लेख केलेला आहे. प्रश्न एवढा आहे की, इथे महापालिकेचे सिम्बॉल पाहिजे आणि नांव मिरा भाईंदर महानगरपालिका पाहिजे. हे फक्त पक्षाचे आहे. हा विषय एवढा मोठा नाही. आपण जेव्हा त्यांना बोलतो तेव्हा आपल्याकडे पण जरा आपण वाकून बघितले पाहिजे.

**मोहन पाटील :-**

विषय असा आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने करावे हा विषय मी बोलत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची हरकत बघा. याच्यामध्ये जे आहे महापालिकेने स्वतः आमंत्रण पत्रिका छापावी.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महापालिका छापेल का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपला ठराव तसा नाही आहे. ज्या नगरसेवकांनी आपला निधी खर्च केला त्याची इच्छा असेल तर त्यांची नांवे टाकायची असा आपला ठराव झाला आहे.

**आसिफ शेख :-**

नगरसेवकांच्या निधीतून काम झाले असेल तर संबंधित बाकी दोन नगरसेवकांची पण नांवे येतील असा ठराव झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तसे नाही आहे. कोणीसुद्धा या शहरामध्ये नगरपालिकेच्या नियमानुसारच चालले पाहिजे. जो ठराव होतो त्यानुसारच चुकीचे केले तर आम्ही अधिका-यांना पण सोडणार नाही. आहे ते स्पष्ट सांगातो. नियम सगळ्यांना सारखा. तुमच्या नावाची तिकडे पाटी लागली, आम्ही बघितली. आज तिकडे लागली मग संपले. त्यामध्ये एवढे काय मोठे आहे.

**आसिफ शेख :-**

निमंत्रणपत्रिका महापालिकेने काढली पाहिजे. त्यामध्ये विरोधी पक्षनेते, सभागृह नेते, सभापती सगळ्यांची नांवे पाहिजेत. आमचे तेच म्हणणे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठराव केला त्याचे काय?

**आसिफ शेख :-**

विरोधी पक्ष नेते कुठे आहेत? संविधानिक पदे कुठे आहेत? त्यांची पण नांवे घ्या. जे ठरवले त्याप्रमाणे केले पाहिजे.

**मा. सभापती :-**

विषय क्र. २१८ ठराव मंजुर.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, जरा क्र. २१८ चे वाचन करुन कायम करुन घ्या. हे दिले तो गोषवारा घ्या. हा ठराव कायम झाला असे लिहून घ्या.

**मा. सभापती :-**

ठराव कायम झाला.

**याकुब कुरेशी :-**

ठराव क्र. २१८ याच्यावर कुठल्याही प्रकारची चर्चा झालेली नाही. भलतीच काहीतरी चर्चा झाली आणि ठराव भलताच पास झाला आहे.

**प्रकरण क्र. २१८ :-**

वृक्ष संवर्धन विभागाकरिता टँकर व ट्रॉली खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. १९९ :-**

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम १९७५ सुधारित २०००नुसार महानगरपालिका क्षेत्रात विर्स्तीण पसरलेल्या ७९ चौ.कि.मी. मध्ये विविध ठिकाणी मुख्य रस्त्याच्या दुतर्फा मोकळया जागेत, मैदान येथे झाडे लावण्यात आली असून,झाडाचे जतन, संगोपन व देखभाल करुन हरित व सुंदर मिरा भाईंदर दिसण्याच्या दृष्टीने पर्यावरणाचा समतोल राखणे व प्रदुषण मुक्त मिरा भाईंदर रहावे याकरिता मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड केलेली आहे. तसेच ठेकेदारा मार्फत वृक्षारोपण सुरु आहे. महानगरपालिकेने **१८ उदयाने, १३ स्मशानभुमी व ३ मैदाने** विकसित केलेली असून त्यांची देखरेख निगा ठेवण्यासाठी १९९० साली एक ट्रॉली अवजारे सामानाची ने आण करण्यासाठी व एक पाण्याचा टँकर खरेदी केला होता. त्यास आता १३ वर्षे पूर्ण होवुन ट्रॉलीची चाके, बेरींग खराब झालेली असून, चेसी व पत्रा खालुन पूर्ण खराब झाला आहे. ट्रॉलीत नियमित बिघाड होत आहे. तसेच टँकर लिकेज असल्याने पाणी रस्त्यामध्येच वाहून जाते त्यामुळे दूरवरच्या क्षेत्रामध्ये झाडाना पाणी देणेस विलंब होतो. सध्या वृक्षसंवर्धन विभागात एकच टँकर व ट्रॉली असल्याने महानगरपालिकेच्या पाचही विभागात तातडीने कामे करणेस शक्य होत नाही. करिता दैनंदिन कामे वेळेवर होण्यासाठी व विभागवार झाडांना पाणी देणे, मातीची भरणी करणे अवजाराची ने आण करणे प्रसंगी कामगारांना घेवुन जाणे इत्यादी कामाकरिता एक नविन टैंकर व ट्रॉलीची आवश्यकता आहे

**१) टँकर चार चाकी - (५००० लिटर क्षमता)**

**२) ट्रॉली दोन चाकी**

वरीलप्रमाणे टँकर व ट्रॉली खरेदी करणेस अंदाजे ५,००,०००/- (पांच लाख रुपये) इतका खर्च अपेक्षित असून सदर कामी सन २००३-०४ अंदाज पत्रकीय अर्थसंकल्पाच्या ''फ'' संकिर्ण ''वृक्षारोपण कार्यक्रम'' या शिर्षका अंतर्गत रक्कम रु. १,२०,००,०००/- (एक कोटी वीस लाख ) मधुन तरतूद उपलब्ध आहे. या तरतूदीतुन एक टँकर व ट्रॉली खरेदी करणे कामी येणा-या खर्चास वृक्ष प्राधिकरण समितीने दिलेल्या मंजूरीस अनुसरुन एक टँकर व एक ट्रॉली नविन खरेदी करणेस व जुनी दुरुस्ती करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत असून संबंधित विभगाने (भांडार ) तातडीने आवश्यक ती कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन व. म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २१९ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

याच्यातून आपल्याला उत्पन्नाचे साधन महानगरपालिकेसाठी झाले होते आणि नवीन जर मिळत असेल.

**शरद पाटील :-**

आपण आता किती जागा दिलेल्या आहेत, ७५ जागा. या ७५ पेक्षा आणखी जागा आपल्याकडे उपलब्ध होऊ शकत नाही का? याचा अधिका-यांनी सर्वे केला आहे का?

**मा. सभापती :-**

जसजसे रोड होतील तसतशा जागा आपल्याकडे उपलब्ध होतील.

**शरद पाटील :-**

दुसरी गोष्ट. जे हायवे आपल्या ताब्यात नाहीत. हायवेवर आपण जाहिरात करु शकत नाही आणि बी.एस.ई.एस.च्या खांबावर जाहिरात करु शकत नाही. याचा आपण त्यांच्याशी काही पत्रव्यवहार केलेला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

केलेला आहे.

**शरद पाटील :-**

आणि त्याचा काय निर्णय आपल्याला झालेला आहे? अजूनपर्यंन्त त्यासाठी एवढे ढिले का चाललेले आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

एक गोषवा-यामध्ये करेक्शन करायचे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने आलेल्या होर्डिंग्ज उभारण्यांस मंजुरी देणे. हे जे नवीन होर्डिंग्ज आपण उभारणार आहोत. त्याला मंजुरी द्यावी.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, इथे सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी जो विषय उपस्थित केला. बी.एस.ई.एस.चे अधिकारी सावळे आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी मला वाटते. उपआयुक्त केळकर साहेब तुम्ही सुद्धा त्या सभेला उपस्थित होते. मा. आयुक्त शिंदे साहेब यांनी त्यावेळी क्लिअरली इंडिकेशन दिलेले होते की, पोलवर होर्डिंग्ज उभारण्यांस बी.एस.ई.एस.चे कोणत्याही पद्धतीची आवश्यकता नाही. ती आपली मालमत्ता आहे. त्या पोलचे आपण त्यांना पैसे रितसर भरणा केलेले आहेत.

**शरद पाटील :-**

अधिकारी वर्ग तुम्ही दिरंगाई का करिता आहात.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

यामध्ये दिरंगाई नाही आहे. यामध्ये बी.एस.ई.एस. सोबत संबंधित ब-याच वेळी पत्रव्यवहार केला आहे आणि ज्यावेळेस त्यांनी होर्डिंग्ज लावण्यांत आले ते काढण्यांत सुद्धा आले होते. त्याच्यामुळे आम्ही त्यांच्याशी पत्रव्यवहार करुन महापौर महोदयांच्या केबीनमध्ये सभापण बोलावण्यांत आली होती आणि त्यावेळेस आम्ही हा विषय तिथे त्यांच्याकडे प्रस्ताव ठेवला. त्यांनी सांगितले की, आमच्या बी.एस.ई.एस.च्या कार्यकारी मंडळावर चर्चा होऊन त्याबाबत निर्णय घेण्यांत येणार आहे. अन्य ठिकाणी अशा त-हेच्या परवानग्या दिल्या नाहीत. तिथलाही आम्हांला विचार करायचा आहे. परंतु, त्याबाबत अद्यापपर्यंत त्यांच्याकडून काहीही निर्णय झालेला नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

उपआयुक्त साहेब, माझ्या माहितीप्रमाणे ही सभा जूनमध्ये झाली होती.

**शरद पाटील :-**

साहेब, ह्या सभेवर आपण सगळे त्यांना दिलेले असून सगळ्यांचे पैसे त्यांना चुकवले आहेत आणि सगळी प्रॉपर्टी आपल्या क्षेत्राची आपल्या जागेत असतांना त्यांची दादागिरी चालत असे, असे मला वाटते आणि त्याचे त्याला जर उत्तर मिळत नसेल आणि त्याच्यावर काही निर्णय होत नसेल तर हे बरोबर नाही आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आपण इलेक्ट्रिक पोलला जाहिरात फलक लावण्यासाठी संबंधितांना परवानगीच द्या.

**आसिफ शेख :-**

आतापर्यंन्त शहरात किती होर्डिंग्ज लावलेले आहेत.

**संजय दोंदे :-**

शंभर होर्डिंग्ज लागले आहेत.

**आसिफ शेख :-**

आता तुम्ही ७५ आणले. मग याच्यापुढे आणखी किती आणणार आहे? आपण सर्वे करायला पाहिजे. तुम्ही टप्प्याटप्प्याने प्रस्ताव कसा आणता? एकत्र सर्वे करुन एकत्र आणा.

**शरद पाटील :-**

म्हणजे पहिले १०० लागलेले आहेत आणि आता ७५ आणले आणि अजून जागा आहेत ना. तेच मी पहिले विचारले. ह्या ७५ पेक्षा अजून जागा आहेत का?

**आसिफ शेख :-**

आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

नवीन ब्रीज झाल्यानंतर परत जागा उपलब्ध होणार आहेत.

**शरद पाटील :-**

माझा फक्त एक प्रश्न आहे. आता जो काशीमिरा टर्नवर जो होन्डाईचा बोर्ड लागला आहे त्या बोर्डमुळे कितीतरी अपघात होतो आणि त्रास होतो. तो बोर्ड काढायचा असे ठरलेसुद्धा होते आणि तो बोर्ड अजूनही काढला नाही. होन्डाई ॲडचा तो बोर्ड आहे. टर्नवर बोर्ड आहे. आयुक्त साहेब पण बोललेले तो आपण काढायचा आणि आपण तो काढलेला नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

याबाबत बोर्डमुळे काशीमिरा कॉर्नरला शिवाजी पुतळ्याजवळ आपणाकडून काही नगरसेवकांचे पत्र आले होते की, याचे अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे आम्ही पोलिसांना यामध्ये कळविले होते की, यामुळे निश्चित अपघात होण्याची शक्यता आहे का? त्याबाबत अद्याप काशीमिरा पोलिस स्टेशनकडून काहीच उत्तर आलेले नाही.

**शरद पाटील :-**

उपआयुक्त साहेब, आता पोलिसांकडून काय निर्णय येईल तो येऊ द्या. पण सध्या अशी स्थिती आहे की, तिथे त्याचा त्रास होतो आणि त्याच्यामुळे त्या बोर्डाचा आधार घेऊन त्याच्याखाली फेरीवाले बसतात. तो तिथून बोर्ड काढून टाकणे चांगले सोयीचे होईल असे आम्हांला वाटते. तरीसुद्धा तुम्ही त्याच्यावर विचार करावा.

**मिलन म्हात्रे :-**

काही रक्कम आहे ती आवकमध्ये दाखवलेली आहे. आज त्याला वर्ष होत येईल आणि हा प्रस्ताव आता तयार होत आहे. जर याला आपण आता मंजुरी दिली तर माझ्या मताने सगळयात जास्त बजेट हा ठरलेला आहे. सहा ऐवजी बत्तीस लाख पंचवीस हजार जास्तीत जास्त रक्कम आपल्याला ही कंपनी द्यायला तयार आहे. ह्या प्रस्तावावर आपण विचार करायचा आहे आणि त्यांना द्यायचे आहे किंवा नाही ते ठरवायचे आहे. कारण ते आपल्याला जास्तीत जास्त देणार आहे आणि द्यायला हरकत नसावी असे मला वाटते. पण ह्याच्यामध्ये मी ह्याबद्दल दोन तीन सुचना सुचविल्या होत्या की, शहरामध्ये सर्व ठिकाणी पोस्टर लावले जातात. एखादे दुकान उघडले तर लावले पोस्टर किंवा एखादे शोरूम उघडले तर लावले पोस्टर. ह्या पोस्टरचे आपण फोटोग्राफ काढून लमसम पाच हजार, दहा हजार जाहिरात कर आपण लावून टाकायचे. त्याच्याने उत्पन्न वाढेल आणि शहरामध्ये जी भडक रंगाची पोस्टर लावले जातात, तर हा विषय निराळा आहे. त्यावेळेला मी उल्लेख केला होती की, काही कमर्शीयल ग्रुपची कापडी बोर्ड लागतात, प्लास्टिकचे होर्डिंग्ज लागतात, बत्यांवर प्लास्टिकचे होर्डिंग्ज लागतात ते आपण काढा. पण पहिले त्यांना रितसर फोटोग्राफ घेउन पाच-पाच, दहा-दहा हजार रुपये दंड लावा. ते पैसे कंपनीच्या ॲड्रेसवर पाठवून द्या. मग ती कुठलीही कंपनी असू दे आणि नंतर ते काढून घ्या. त्याच्याने आपल्याकडे जे काही जमा होईल, त्याच्याने नगरपालिकेकडे काही पैसे जमा होतील आणि शहराला एक शिस्त लागेल की, वाटेल त्या ठिकाणी पोस्टर लावता कामा नये. अगदी दोन दोन दिवसांनी पोस्टर लागलेले असतात. ह्याचा विचार मागच्या सभेत सांगितला होता तरी केला गेला नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे महानगरपालिकेत काहीच जमा होणार नाही. आपण डायरेक्ट कार्यवाही करू.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण असे बोलू नये. एखादे आपण त्यांना पेनल्टीसाठी नोटीस पाठविली तर त्याला तुमचा क्लेम लागला. तुमच्या एरियामध्ये त्यांनी दहा हजार पोस्टर लावले, पाचशे बॅनर लावले ते तुम्ही त्यांना द्या की, हे बॅनर तुमचे लागलेले आहे आणि त्याचे जाहिरातीच्या कराचे हे धोरण ठरलेले आहे. केळकर साहेब, आपण एकीकडे धोरण ठरवतो आणि एकीकडे तुमच्याकडे येतात आणि कर भरतात त्यांच्याकडून तुम्ही लाखो रूपये घेता आणि शहरामध्ये तुम्ही जे बॅनर लावता. अगदी वाटेल तसे चालू असते. दर आठवड्याला नाक्या-नाक्याला निरनिराळे बॅनर लागलेले असतात. मी काही राजकीय पक्षाचे बोलत नाही तर सगळयांचे बोलतो. पण ह्याच्यावर आपण काहीतरी बंधन घालाल की, नाही? का, त्यांना आपण सगळे शहर फ्री द्यायचे. टिकीट काढून जातात त्यांना ट्रेनमध्ये बसायला जागा नाही अशातली ही गत आहे. त्याकरिता जो चुकीचा माणूस आहे त्याने तुमची परमिशन न घेता जाहिरात केलेली आहे तर त्या जाहिरात कराचे आपण चार्जेस लावावे.

**रिटा शाह :-**

साहेब, मिलन म्हात्रे बोलतात ते बरोबर आहे. पोस्टर, बॅनर्स त्याला कुठेही कायदा कानुन नाही आहे. रात्री उठले की बॅनर लावले, रात्री उठले की भिंत रंगवली.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, तत्कालिन नगरपरिषदेच्या काळामध्ये सर्वसाधारण् सभेमध्ये ठराव आलेला. त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. तेव्हा सांगितले की, ह्या संपुर्ण मिरा भाईंदर शहरासाठी जे रस्ते आहेत, बॅनर, पोस्टर लावतात. त्याच्यासाठी टेंडर काढा म्हणून जसे ऑक्ट्रायचे टेंडर काढले त्याप्रमाणे टेंडर काढण्यात यावे आणि सदर ठेकेदाराला देउन टाका.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी सुचना केल्याप्रमाणे, आपल्याला माहिती आहे की शहरामध्ये जागोजागी बॅनर, पोस्टर्स लावले जातात आणि कशाप्रकारे शहराचे विदृपीकरण केले जाते. त्याच्याकरिता १ एप्रिल, २००४ पासुन ठेका पद्धतीने देण्याचा प्रस्ताव आयुक्त साहेबांना विचारून करू आणि जे कोणी यापुढे शहरात जाहिरात लावतील त्यांच्यावर कर लावण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला समजले नाही, आपण जरा सविस्तर सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्याकडे दैनंदिन ह्याच्यावर देखरेख ठेवणे आणि असे पोस्टर शोधून काढणे. याकरिता असणारा कर्मचारी वर्ग अपुरा आहे. हे सर्व लक्षात घेता आणि सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे ह्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याला जर तत्परतेने कार्यवाही करायची असेल तर आपण हे काम ठेका पद्धतीने देउ आणि जो अधिक कार्यक्षमतेने कार्य करू शकेल त्याला द्यायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दंड आकारणे पहिली गोष्ट म्हणजे जे लावतील ते सर्व साफ करणे व त्याच्यानंतर दंड आकारणे आणि नविन लावताना परवानगी घेउन, फी घेउन ते लावणे.

**रिटा शाह :-**

साहेब, त्याच्यामध्ये इन्क्लूड करा जे भिंतीवर लिहितात.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, ते होन्डाई बोर्डाचे काय करणार त्याच्यावर आपण निर्णय द्या. त्याच्यामुळे भरपूर ॲक्सीडेंट होतात.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पोलीसांना आपण कळवले आहे पण अद्याप अजूनपर्यंत त्यांच्याकडून आपल्याला काही आलेले नाही. अशा तऱ्हेचे अपघात झाले असेल तर ते बोर्ड तेथून लगेच काढून टाकण्यात येईल.

**चंद्रकांत वैती :-**

आज जाहिरातीचा बोर्ड लावण्याचा जो विषय आहे त्याचा ठराव मी मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २१९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने होर्डिंग उभारणेंस मंजुरी देणे.

**ठराव क्र. २०० :-**

मा. स्थायी समिती सभेने दिलेल्या आदेशानुसार जाहिरात फी विभागाचे उत्पन्न वाढवण्यासाठी जाहिरात फी विभागा तर्फे महापालिका क्षेत्रात नव्याने सर्व्हे करण्यात आला व या अगोदर लावण्यात आलेल्या होर्डीग व्यतिरिक्त अन्य ७५ ठिकाण जाहिरात फी विभागामार्फत निश्चित करण्यात आले असून त्या नुसार नव्याने होर्डीग उभारण्याबाबत ग्रुप K या नावाने तयार करण्यांत आले. दिनांक १/१/२००४ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध केल्या नंतर महापालिका क्षेत्रात नव्याने ७५ ठिकाणी होर्डीग उभारण्याबाबत खालील एजन्सीने निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | होर्डींग ग्रुप | एजन्सी | वर्ग | भरलेले दर | अपेक्षित दर (वार्षिक) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | K | मे. विनस मल्टी मिडिया प्रा. लि. | १<br>२<br>३<br>४<br>५ | ६,३५,०००<br>६,४०,०००<br>६,४५,०००<br>६,५०,०००<br>६,५५,०००<br>**३२,२५,०००** | ६,२३,७०० | सर्वात जास्त दराने भरलेले आहेत |
| २ | K | मे. मरक्युरी ॲडव्हर्टाजिंग ॲन्ड मार्केटिंग | १<br>२<br>३<br>४<br>५ | ६,२५,०००<br>६,२६,०००<br>६,२७,०००<br>६,२८,०००<br>६,२९,०००<br>**३१,३५,०००** | ६,२३,७०० | |
| ३ | K | मे. ॲडटच | १<br>२<br>३<br>४<br>५ | ६,२३,७००<br>६,२३,७००<br>६,२३,७००<br>६,२३,७००<br>६,२३,७००<br>**३१,१८,५००** | ६,२३,७०० | |

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. याकूब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. २२० :-**

माहे ऑक्टोबर २००३ ते डिसेंबर ०३ अखेरच्या त्रैमासिक जमा खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माहे ऑक्टोंबर २००३ ते डिसेंबर २००३ अखेरचे त्रैमासिक जमाखर्चाचे लेखे एम्.ए.सी. १९७१ नमुना नं. २६ नुसार तयार करुन मुख्यलेखापरिक्षक यांचेकडील

तपासणी करुन घेण्यांत आलेल्या त्रेमासिक जमाखर्चास तसेच पुर्नविनियोजनास आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.
(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२१ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण पॅनल वकील नेमलेले आहे आणि जेव्हा जेव्हा आपल्याला मार्गदर्शन पाहिजे तेव्हा आपण हायकोर्टाचे वकील आहेत त्यांच्याकडे आपण मार्गदर्शन मागत असतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार आपल्या या महापालिकेच्या स्वतःकडे या कार्यालयामध्ये चोवीस तास ही जी सेवा आहे ती आपल्याकडे उपलब्ध पाहिजे. असे नियम आणि कायदा बोलतो. त्याकरिता हे पद ती व्यक्ती कोण आहे? व हे सर्व त्याच्या क्वॉलिफिकेशनवर ठरते. त्यांचे जर क्वॉलिफिकेशन या पदाकरिता लागत असेल व तेवढे त्यांच्याकडे असेल तर आपल्याला हा ठराव मंजुर करायला काही हरकत नाही आहे. पण हे करत असताना त्याच्याकरिता त्यांना लागणार स्टाफ कारण आता आपण संगणकाचे अधिकारी नेमले तर जवळ जवळ दोन-तीन महिने ते इकडे तिकडे नुसते फिरतच होते. पण आता आपण जे नविन पद तयार करतोय, त्याच्याकरिता लागणारा स्टाफ त्याच्यादेखील ह्याच्यामध्ये उल्लेख पाहिजे. हा टोटल क्लेरीकल जॉब आहे. त्यांना लागणारी स्टेशनरी, बसण्याचे ऑफीस, फर्नीचर, स्टाफ, टायपिंग, स्टेनो वगैरे जे कोण लागतील ते ह्याच्याबरोबर आले पाहिजे होते. ते आपण ह्या ठरावात ॲड करून घ्या आणि मग मंजुरी द्या कारण आता आचारसंहिता लागणार आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला हे असे निवृत्त माणसे नको आहेत. आपल्याला चांगले सक्षम असलेले ॲक्टीव, डॅशींग असे आपल्याला वकील पाहिजे. ते ताबडतोब पाठवणार आणि स्टे ऑर्डर घेउन येणार. ते रिटायर झालेले असल्यामुळे ते येथून काही धावू शकणार नाही आणि काम करू शकणार नाही. असे आपल्याला पगार पाच हजार रूपये द्यायचे, दहा हजार रूपये द्यायचे. जसे आपण डॉक्टर साहेबांना पंचवीस हजार रूपये एवढा पगार देतो तसे ही देवू शकतो पण आपल्या महानगरपालिकेत सक्षम अधिकारी ठामपणे पाहिजे. एवढे पाच-पाच, सहा-सहा वकील असूनदेखील आपल्याकडे नगरपालिकेची काहीच कामे होत नाही. त्याच्यासाठी एक जर सक्षम असेल तर आपण त्या पाच ही जणांना बंद करू शकतो आणि एकच ठेवू शकतो.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, श्री. साळवी हे सेवानिवृत्त न्यायाधिश आहेत आणि गेल्यावर्षी सेवानिवृत्त झालेले आहेत शासनाच्या सेवेतून आणि ५७ वर्षानंतर कुठलाही व्यक्ती ६० वर्षापर्यंत काम करण्यासाठी सक्षम राहतो.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण या संदर्भात रूलिंग द्या.

**मा. सभापती :-**

मला येथे निवृत्त असे कोणी ही नको. मी सदरचा विषय नामंजुर करत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला देखील आपण एक ठराव असाच फेटाळला राज पाठक ह्यांचा आणि स्थायी समितीने ठरविले की, ते घ्यायचे नाही. तर प्रशासनाने टेंडरवर ते पद मागवले.

**आसिफ शेख :-**

चौकशी करा ते कोणी काढले?

**चंद्रकांत वैती :-**

आयुक्त साहेब काढतील, दुसरे कोण काढेल?

**मिलन म्हात्रे :-**

माझी अशी सूचना आहे की, आपल्याला जर त्या नावाला विरोध असेल तर.

**मा. सभापती :-**

माझे कोणाला विरोध नाही. जर तुम्हाला काम करायचे असेल तुम्ही जाउन ते पाचही वकील बंद करा. गेल्या बुधवारी त्यांच्याकडे केसचे उत्तर मागवले होते व राणे साहेबांकडून पण आज दुसरा बुधवार आला तरी अजून उत्तर आलेले नाही. वकील काय काम करतात? आपल्याला सक्षम व्यक्ती पाहिजे जो इथे बसणारा आणि त्यांच्याकडे आपण विचारपूस करू शकतो की, आपला कार्यक्रम काय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे असे आहे की, हे पद आपण निर्माण करा.

**मा. सभापती :-**

आपण ठराव केलेला आहे की, हे पद आपल्याला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवा.

**मा. सभापती :-**

फक्त हे जे रिटायर व्यक्तीसाठी जे पद आले आहे ते फेटाळून लावा असे मी सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

विधी सल्लागार म्हणून नेमणूक करणे. त्याच्यानंतर पेपरला नोटीस काढा व इन्टरव्ह्यू घ्या आणि विधी सल्लागारची नेमणूक करा.

**मा. सभापती :-**

तसे करावे.

**आसिफ शेख :-**

महापालिकेत ज्या ज्या पदांची आवश्यकता आहे त्या सर्व पदांची पदनिर्मिती करा आणि शासनाकडे प्रस्ताव पाठवा आणि रितसर जाहिरात द्या.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याला ते पद गरजेचे आहे. कारण आपल्याला वारंवार कायदेशीर अडचणी निर्माण होतात आणि त्याच्यावर आपल्याला तातडीने सल्ला उपलब्ध होण्यासाठी आपल्याला तसे सक्षम स्टाफ पॅटर्न पाहिजे. पण विहित पद्धतीने घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सदर पद हे आपल्याला रोस्टर पद्धतीने गर्व्हरमेंट कडून मंजुर झालेले आहे. ते पद ही जी व्यक्ती आहे ती कायमस्वरूपी आपल्या पदावर येण्याकरिता जो कालावधी लागेल तो कालावधीकरिता तुम्ही त्यावेळेपर्यंत ह्यांना नेमले तरी चालेल.

**आसिफ शेख :-**

तसे नाही.

**मा. सभापती :-**

आपण त्याला नोटीस देत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, गर्व्हरमेंटकडून जो अधिकारी येतो त्याला जो कालावधी लागतो तिथपर्यंत ह्यांना तुम्ही ह्या पदावर ठेक्यापद्धतीने घ्या.

**मा. सभापती :-**

ठेका पद्धतीवर आपल्याला कोणी ही नको आहे.

**चंद्रकांत वैती :-**

पण आपल्याला असे कायमस्वरूपी घेता येत नाही. हे जे स्टाफ पॅटन आहे त्याच्यात ते मंजुर पद आहे आणि आपल्याला वेळोवळी कायदेशीर सल्ले लागतात. आता इथे जो निवृत्त न्यायधिश बसेल तो त्या कोर्टात जाणार नाही. कोर्टाचे काम वकीलालाच करायचे आहे. सभापती साहेब, स्टाफ पॅटर्नमध्ये जे मंजुर पद आहे तर ही व्यक्ती नाही दुसरी व्यक्ती पण आपल्याला विधी सल्लागार हा घ्यावाच लागणार आणि आपण प्रतिनियुक्तीवर कुठलेही पद घेताना सुरूवातीचा कालावधी हा सहा महिन्याचाच असतो आणि आपल्या समोर अनेक तंटे उभे राहतात. आताच आपण सांगितले की, प्रत्येक पोलवर बी.एस.ई.एस. परवानगी देत नाहीत. ह्याबाबत सक्षमतेने निर्णय घेण्यासाठी ती व्यक्ती न्यायधिश असेल. ते निवृत्त न्यायधिश आहेत आणि तिथे वकील बसून चालणार नाही. तिथे वकील फक्त भांडायचेच काम करेल. न्यायदानाचे काम किंवा संबंधित गोष्टी फॉलो करण्याचे काम ती व्यक्ती करेन व उपआयुक्त साहेब आपण वास्तविक हा विषय आणताना सदर व्यक्तीचा बायो-डाटा देखील जोडायला पाहिजे होता. त्यांच्या कार्याचा अनुभव, त्यांचे वय, त्यांची क्षमता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांचा बायो-डाटा येथे आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, कोणताही प्रस्ताव स्थायी समिती समोर आल्यानंतर त्या प्रस्तावावर सर्व सभासद विचार करतात व निर्णय घेतात आणि आपण ठरविले की, मागच्यावेळी ते पद भरायचे नाही. असे असताना ही सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सांगितले की, टेंडर काढले आणि नोटीस लावलेली आहे. मग हा स्थायी समितीचा अपमान आहे की, नाही? स्थायी समिती कशासाठी आहे.

**मा. सभापती :-**

नोटीस कोणी काढलेली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, मी ह्याचा खुलासा करू इच्छितो की, आपल्याकडे गेल्या सभागृहामध्ये हा विषय पटलावर होता. आपल्याकडे श्री. राज पाठक ह्यांची उपविधी आणि नियम तयार करण्याकरिता नेमणूक करावी. परंतु त्यावेळेस सभागृहाने असा निर्णय घेतला की, ह्या कामी नाईक साहेबांची नियुक्ती करावी. परंतु नाईक साहेबांनी मा. आयुक्त साहेबांना सांगितले मला एवढा वेळ उपलब्ध नाही. कारण की बायलॉज तयार करणे ही एक कायदेशीर बाब आहे. त्याच्यामध्ये अनेक किचकट प्रश्न निर्माण होतात आणि बायलॉजचे नियम तयार करताना कायदेशीर तरतुदी बघून आणि त्या बघितल्यानंतर त्याचा अंतर्भाव त्याच्यामध्ये करणे त्यामध्ये आवश्यक असते आणि तो जो एकदंरीत जो विषय आहे. तो भरपूर लिखाणाचा विषय आहे आणि तेवढे लिखाण करण्याकरिता त्यांना वेळ उपलब्ध नसल्याने त्यांच्या ऐवजी सेवानिवृत्त सल्लागार नियुक्त करावे असा त्यावेळेस आयुक्त साहेबांनी प्रस्ताव सादर केला आणि त्याप्रमाणे आयुक्त साहेबांनी हा सल्लागार नियुक्त करण्यासाठी त्यांच्या अखत्यारिमध्ये ही निविदा काढलेली आहे आणि त्यामध्ये गैर असे काही नाही आहे. त्यांनी आपणाकडे प्रस्ताव पाठविला होता. आयुक्त साहेबांना नेमणूका करण्याचे अधिकार आहेत. परंतु तरीदेखील आयुक्त साहेब आपणाकडे सादर करतात व आपल्या सभागृहाचे जास्त मान ठेवतात आणि त्यांना लोकशाहीप्रदान अशा सभागृहाचे नेहमी आदर असल्यामुळे ते प्रस्ताव आपणासमोर ठेवतात. व त्यांनी असे कोणतेही गैर केलेले नाही त्यामध्ये आणि जी नियुक्ती करण्याचे ठरलेले आहे तर सल्लागार म्हणून त्यांना नियुक्त करायचे आहे. कारण की, मी आपल्याला ह्यापुर्वी ही सांगितलेले आहे की, हे फार मोठे काम आहे. बायलॉज तयार करणे किंवा नियम तयार करणे हे काही एक दिवसाचे काम नाही आहे व यासाठी राजपाठक साहेबांची किंवा अन्य कोणाच्या नियुक्तीसाठी त्यांनी पेपरला निविदा दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

आम्ही फेटाळले होते तर आपण हा विषय मा. महासभेत घ्यायला पाहिजे होते.

**रिटा शाह :-**

मला असे वाटते की, सभापतींच्या निर्णयानंतर कुठलीही चर्चा नसते.

**आसिफ शेख :-**

जेव्हा आपण ठराव केला आणि नाईक साहेबांची नियुक्ती केली आणि नाईक साहेब हे काम करण्यास तयार नाही ही बाब सभागृहाच्या निर्दशनास आणून द्यायला पाहिजे होती.

**मा. सभापती :-**

माझा निर्णय हा ठाम असला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

जेव्हा महापालिकेत लोकनियुक्त प्रतिनिधी काम करत असतात. तेव्हा त्यांची जबाबदारी असते निर्णय घेण्याची.

**मा. सभापती :-**

आम्ही निर्णय घेतलेला आहे. तिथे कोण पाहिजे आणि कोण नाही आणि आम्हाला आता तिथे कोण पाहिजेच नाही.

**आसिफ शेख :-**

जी पदे मंजुर आहेत ती आपण प्रतिनियुक्तीवर मागवा आणि आपल्याला विधी सल्लागार नेमायचे आहे तर महाराष्ट्र शासनाकडे विधी व न्याय विभाग आहे. तुम्ही त्यांना पत्र पाठवा की, आम्हाला प्रतिनियुक्तीवर आपण माणूस पाठवा. ही रिटायर माणसे कशाला पाहिजे? सभापतींच्या भावनेशी आम्ही सहमत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

पहिली गोष्ट म्हणजे ही जी नोटीस काढलेली आहे त्यामध्ये तुम्हाला जे काही करायचे आहे. तुम्ही म्हणालात उगीच खोटी माहिती देउ नका. कुठे रेकॉर्डवर आले आहे का? शिवमुर्ती नाईक साहेबांनी लेखी पत्र दिले आहे का? तोंडीवर आम्ही विश्वास ठेवणार नाही? आज पाणपट्टे साहेबांकडे कुठलाही चार्ज नाही. असे असताना स्थायी समितीला ओव्हरटॅक करून तिकडे नोटीस काढली. या महापालिकेमध्ये स्थायी समिती जिथपर्यंत अस्तिवात आहे तिथपर्यंत तुम्हाला जे काही करायचे आहे तर चार ओळीचे पत्र आपण आम्हाला फेरविचाराकरिता द्या. अवलोकनाकरिता द्या.

**मा. सभापती :-**

आम्ही निर्णय फेटाळला तर आपण मा. महासभेसमोर तो विषय आणा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, फेटाळला त्याचा प्रश्न नाही. पण आपल्याकडे परत फेरविचार होउ शकते आणि आम्ही तुम्हाल क्लिअरकट सांगितले होते की, तीन तीन उपआयुक्त आपल्याकडे आहेत. त्याच्यामध्ये आजही पाणपट्टे साहेबांना तुमच्या आस्थापनेनुसार, रेकॉर्डनुसार कुठलाही चार्ज जास्त नाही आहे. त्यांच्याकडे एक उपायुक्त गाडी, ऑफीस प्युन, स्टाफ सगळे घेउन बसलेले आहे. त्याच्याकडे तेवढे काही काम नाही आहे. त्यांचे तेवढे स्टेट्स आहे म्हणून त्यांना इथे उपआयुक्त म्हणून घेतले आहे. तुम्ही त्यांच्यावर काम सोपवा आणि हे जे प्रकार आहेत तर आपण आम्हाला कोणालाही असे डॉमीनेट करायचे नाही की, आयुक्त साहेब मोठे आणि आम्ही लहान हा प्रकार नाही आहे. जो नियम आपण ओव्हरटेक करतोय ती पद्धती आपण बंद करा. अन्यथा आम्हाला भरपूर ऑप्पुलेट ॲथोरटी आहे. तुम्हाला ज्या दिवशी खरोखर त्रास द्यायचे ठरविले तर त्यादिवशी बरोबर पद्धतशीर प्लानिंग करून करू. जे समन्वयाने चालले आहे ते समन्वयानेच चालू राहिले पाहिजे. अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. तुम्ही चार ओळीचे पत्र सन्मा. सभापती साहेबांकडे दिले असते की, असे असे आमचे ठरलेले आहे व आयुक्त साहेबांचा हा निर्णय झालेला आहे. ह्याच्यात तुम्ही फेर अवलोकन करा किंवा फेर विचार करा. असे अनेक प्रस्ताव स्थायी समितीसमोर येउन गेले आहेत. त्याचा फेर अवलोकन झालेला आहे, त्याचा फेरविचार झालेला आहे. हे आपण करायला पाहिजे. जेव्हा आम्ही डायरेक्ट नोटीस बोर्डावर बघतो जे आम्ही फेटाळले आहे ते इथे लागले आहे. व फक्त शब्दरचना बदलली. आडनावामध्ये बदल होईल आणि फार तर फार काय प्रोसिजर तिच राहणार आहे. स्थायी समितीला ओव्हरटेक करून तुम्ही डायरेक्ट घेणार. सभापती साहेब, ह्या प्रस्तावामध्ये आता हा आलेला विषय विधी सल्लागार हे नियमानुसार आपल्याला घ्यायलाच लागणार आहे. हे जे पद आहे ते आपण घेउ या म्हणजे त्यांची नियुक्ती करणे ही सभा मंजुरी देत आहे. त्यांच्या बायो-डेटासह तुम्ही प्रेस नोट काढा, वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्धी द्या. मग पाच पंचवीस उमेदवार येउ दे. त्याच्यात कोण तल्लख आहेत किंवा आपल्याला एखादा सुप्रीम कोर्टाचा माजी न्यायाधिश मिळेल. अगदी चांगले आहे. हा फोर्थ क्लास मेजिस्ट्रेट असू शकतो. उद्या सेशन कोर्टचा

न्यायाधिश मिळू शकतो आणि जर हायकोर्टाचा माजी न्यायाधिश जर आपल्याकडे आला तर त्यात काय वाईट आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

वर्तमानपत्रात प्रसिद्धी करायचे.

**मिलन म्हात्रे :-**

होय. ह्याच्यामध्ये आपण कुठली रिक्स घेउ नका. एखाद वेळेस बऱ्याचशा लोकांची जास्त मोठी डिग्री असू शकते तो माणूस आपल्याला मिळू शकतो.

**आसिफ शेख :-**

आपल्याला रिटायर माणसे भरायची आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे पदनिर्मिती झालेली आहे.

**आसिफ शेख :-**

जर पदनिमिर्ती झालेली आहे तर तुम्ही शासनाकडे विधी न्यायविभाग आहे त्यांच्याकडे तुम्ही प्रतिनियुक्तीवर माणूस मागवा. चांगला सक्षम असा क्वॉलिफाईड माणूस मागवा जसे सभापती साहेबांनी सांगितले, तसे पत्र देवून मागवा. आता तुम्ही टेंडर नोटीस काढणार मग सगळयांसाठी टेंडर नोटीस काढा. एक तर एकच धोरण सगळीकडे राबवा. सगळे रिटायर माणसे तुम्हाला भरायचे आहेत का, तर सगळे रिटायर माणसे भरुन टाका सहा सहा महिन्यासाठी. आपल्याला येथे कार्यक्षम माणसे पाहिजे, आपल्याकडे कार्यक्षम माणसे असताना शासनाला पत्र लिहा की, आमच्याकडे असे पद मंजुर आहे आणि पदनिर्मिती झालेली आहे. या ठिकाणी आम्हाला प्रतिनियुक्तीवर संबंधित माणूस पाठवा. जे अधिकार आहेत त्या अधिकारांचा वापर करा.

**मिलन म्हात्रे :-**

शासनाकडून आलेले सर्व अधिकारी कार्यक्षम असतात असे नाही.

**आसिफ शेख :-**

ते त्यांच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण येथे घेतलेला निर्णय परत नोटीस बोर्डावर लागतो हे बरोबर नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, ह्यावर ॲक्शन घेतील. जेव्हा या ठिकाणी लोकनियुक्त प्रतिनिधी सत्तेवर असतात आणि आपली ही स्थायी समिती आहे तेव्हा सगळे अधिकार हे लोकप्रतिनिधीने घ्यायचे असतात. प्रशासनाने अधिकार कधी घ्यायचे जेव्हा समिती नसेल किंवा समिती बरखास्त झाली असेल तर प्रशासनाने निर्णय घ्या तुम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे. जेव्हा नाईक साहेबांनी मनाई केली तर आपण आम्हाला सांगायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण आपली रूलिंग व्यवस्थित द्या. हे जे पद आपण निर्माण करत आहोत, ह्या पदाकरिता आवश्यक जे उमेदवार आहेत, रितसर पेपर नोटीस आपले जे मुळ अधिकारी येईपर्यंत त्या कालावधीकरिता घ्या.

**मा. सभापती :-**

वृत्तपत्रात नोटीस काढून उमेदवार मागवावेत.

**मिलन म्हात्रे :-**

वर्तमान पत्रात असे द्या की, इच्छूक उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह ह्या तारखेला मुलाखतीसाठी यावे.

**मा. सभापती :-**

इंटरव्ह्यू कोण घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या येथे उपआयुक्त दर्जाचे अधिकारी आहेत.

**आसिफ शेख :-**

स्थायी समिती घेईल.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब आपल्या परवानगीने बोलते, आता आपण बोलले की, आपल्याकडे एवढे वकील आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ॲडव्होकेटचे आपण जे मघाशी बोललात ते तेवढे सोपे नसते त्यांना जर तुम्हाला पॅनल वरुन काढायचे असेल तर तुम्हाला ठराव करायला लागेल. त्या व्यक्तींना पॅनलवरून काढताना रिझन द्यावे लागेल व त्यांच्याकडून प्रत्येक दाव्यामधून त्यांच्याकडून एन.आ.सी. घ्यावे लागणार. व ती एन.ओ.सी. घेतल्यानंतर ती कोर्टापुढे प्रोड्यूस करावी लागणार. त्यानंतर दुसरे कोण वकील तुम्ही नियुक्त करणार त्यांचा ठरावामध्ये नावासह उल्लेख करावा लागणार, त्यांच्या फी चा उल्लेख करावा लागेल. ही भरपूर मोठी प्रक्रिया आहे. ते तुम्ही करा. मी त्याला कुठे ही विरोध करत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, ते बोलले ते करा. माझा विरोध वकीलांना नाही आहे. आपण वकीलांना बुधवारी बोलवले व त्यांनी तुम्हाला काय नॉलेज दिले ते तुम्हाला ही माहिती आहे आणि मला ही माहिती आहे. फक्त प्रशासन जेव्हा आपले असते आणि वकील जेव्हा कोर्टात जाउन लढतो. तर तुम्ही जे पुटअप केले तेच ते घेउन फिरतात. पण आपल्याकडे किती केस पेन्डींग आहे. स्टे केस पेन्डींग आहे. ते स्टे आतापर्यंत किती व्हेकेट झाले आहेत किंवा व्हेकेट का झाले नाही? ह्याचा अर्थ आपल्या प्रशासनावर आपण जे कर्मचारी नेमलेले आहेत, त्यांच्यामध्ये काहीतरी कमी आहे. आपल्या अतिक्रमण विभागावर केसरीनाथ म्हात्रे व लिगल डिपार्टमेंट राणे ह्यांना दिलेले आहे आणि तिथे प्रमोद पाटील म्हणून क्लार्क आहे. तर माझे ठाम आरोप ह्यांच्यावर आहे की, ह्यांचे एक ब्रकेट निर्माण झालेले आहे. तो ब्रकेट तुम्ही तोडा. कारण वकील बदलून काय होत नाही. वकील वकीलाच्याच हिशोबाने काम करणार. पण आपल्याकडून त्याला डॉक्युमेंट फिडअप झाले नाही. कारण स्टे घ्यायची मी तुम्हाला एक पद्धत सांगते जसे मागच्या सभेत झाले होते की, केव्हीअट फाईल करताना कसे स्टे मिळतो. कारण आपल्याकडून नोटीस गेली, आता विषय काढलेला आहे व सभापती साहेबांच्या मंजुरीने बोलते, आपल्याकडून नोटीस गेली तर नोटीस सेम दिवशी केव्हीअट फाईल होते आणि स्टे मिळते. फक्त केव्हीअट फाईल स्टे मिळाल्यानंतर होते आणि आपल्याला दाखवतात स्टे मिळाला म्हणून. अशा पद्धतीने केव्हीअट फाईल असताना स्टे मिळते. म्हणून आपल्या प्रशासनाने कोणावर आरोप न लावता फक्त अतिक्रमण विभागामध्ये फेरबदल करा. अशी मी सूचना मांडत आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडमजी सूचना मांडण्याच्या प्रश्नाऐवजी प्रश्न असा आहे की, आजचा जो विषय आहे विधी सल्लागार नियुक्त करणेबाबत.

**रिटा शाह :-**

साहेब, त्याबद्दल तर झाले आणि मी जे आता बोलले ते अध्यक्ष साहेबांची मंजुरी घेउन बोलले आहे. मी त्याच्याबद्दल काही बोलतच नाही, त्याचा ठराव झालेला आहे व अनुमोदन ही झालेले आहे.

**मा. सभापती :-**

मला वाटले तुम्ही विषयाबद्दल बोलत आहात. मी पुर्वी पण बोललो आहे की, जो विषय आहे तो विषय धरून चालायचे आणि बोलायचे. आपली आता प्रोसिडिंग चालू आहे आणि विषय कुठला चालू आहे व त्याला चर्चा कुठली चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

निर्णय काय झाला?

**चंद्रकांत वैती :-**

वृत्तपत्रात जाहिरात देउन इतर न्यायाधिश मागवणे.

**मिलन म्हात्रे :-**

आचारसहिंतेच्या अगोदरच्या ज्या ज्या सभा होतील त्याच्यामध्ये मेहेरबानी करून ठराव कायम करून घ्या.

**आसिफ शेख :-**

ठराव कायम करा आणि त्याच्यावर कार्यवाही चालू करा.

**प्र. सचिव :-**

ज्या त्या विभागाने ठराव लेखी तयार करून ठेवले तर वाचून कायम करता येईल.

**मा. सभापती :-**

राणे, तीन-चार दिवसात वकीलांकडून माहिती येणार होती. ती आली का?

**राणे :-**

तीन-चार दिवसात माहिती घेतो.

**रिटा शाह :-**

साहेब, ह्यांच्याकडे नेहमी असेच उत्तर असते आपण ह्यांची बदली करा.

**प्रकरण क्र. २२१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत मानधनावर विधी सल्लागार नेमणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. २०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत मानधनावर विधी सल्लागार नेमणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन विधी सल्लागार मागविणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२२ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सभापती महोदय, आजचा हा विषय आलेला आहे की, नवघरचे जे ग्राउंड आहे. ते आपल्याला कोणाला देता येणार नाही की देता येईल. ह्यावर बरीचशी चर्चा झाली होती आणि त्यावेळेला आपण ठरवले होते की.,

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर निर्णय झालेला आहे.

**आसिफ शेख :-**

त्यांना ग्राउंड पाहिजे असेल तर देवून टाका.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, ह्याच्यावर निर्णय झाला ते बरोबर आहे. पण असे विषय आणताना आमच्या सदस्यांची तुम्ही कुचंबना करता असा माझा प्रशासनावर ठाम आरोप आहे. तुम्ही असे विषय आणताच का? आणि आता ह्याच्यावर चर्चा नाही झाली किंवा आम्ही त्याला कशाला विरोध करू शकत नाही.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, हे जे ठराव आहेत ते स्थायी समितीमध्ये तुमच्या माहितीशिवाय येतात का?

**मा. सभापती :-**

कधी कधी असेच होते.

**याकुब कुरेशी :-**

असे कसे चालेल.

**आसिफ शेख :-**

विषयपत्रिकेवर विषय घेण्याचे अधिकार सभापती साहेबांचे आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

२२ डिसेंबरच्या मिटींगमध्ये जेव्हा असा विषय आला होता, त्यावेळेला सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये आपल्याला लग्नासाठी परवानगी देता येईल का? तेव्हा बांधकाम विभागाच्या अधिका-यानी सांगितले नवघरच्या मैदानाबद्दल तेव्हा आपल्यापैकीच काही सदस्यांनी सूचना केल्या होत्या की, हा विषय तुम्हाला सोबत घेता येणार नाही तो विषय तुम्ही स्पेसिफिक सभेसमोर आणा. असे सांगितल्यानंतर हा विषय सभागृहापुढे आलेला आहे.

**मा. सभापती :-**

पण ह्याचा पुर्वी निर्णय लागलेला आहे.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, आपण बोललात आणि आम्ही आपल्या मताशी सहमत आहोत. पण असे विषय आणताना एखाद्या नगरसेवकाचा विषय असा आहे आणि ह्याच्यावर आम्ही आता नाही बोलणे किंवा होय बोलणे किंवा काय बोलणे ह्याच्यात आमच्या सदस्यांची कुचंबना होते.

**चंद्रकांत वैती :-**

असा आधी आपला ठराव होता की, कुठल्याही मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी हे मैदान देवू नये. असे आपण ठरविले होते.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, आधीचा जो ठराव आहे त्या ठरावाशी आपण स्टीकअप राहा आणि पुढचा विषय घ्या.

**याकुब कुरेशी :-**

हा विषय फेटाळून लावा.

**चंद्रकांत वैती :-**

नाही पण असा प्रश्न आहे की, विषय फेटाळून लावण्याच्या आधी की, ते महापालिकेचे ग्राउंड खेळाचे मैदान नाही. लग्न आहे आणि संबंधित लग्नाच्या पत्रिका छापल्या आहेत आणि ह्यासाठी आपण महापालिकेच्या भाडेची पावतीपण त्यांना दिलेली आहे. ती जागा देण्यासंदर्भात तर ती पावती दिल्यानंतर आपण कसे काय आपल्या निर्णयाशी स्टीकअप राहणार?

**शरद पाटील :-**

म्हणून सांगतोय पहिला सुद्धा असाच विषय झाला.

**चंद्रकांत पाटील :-**

म्हणून आपण देखील आधीच त्याविषयाशी स्टीकअप राहायला पाहिजे. जयंत पाटील ह्यांच्या भावाच्या मुलीचे लग्न आहे आणि त्यांनी पावती फाडलेली आहे, पत्रिका छापल्या आहेत व पत्रिकेमध्ये स्थळ निर्देशित केलेले आहे. तुम्ही कुठल्या आधारावर ह्या निर्णयाशी स्टीकअप राहायला आम्हाला सांगता?

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आताच प्रशासनाने ह्याचे पैसे घेतले व पावती फाडली आणि मग सभागृहामध्ये मंजुरीसाठी हा विषय आणला. ह्याच्यात ह्यांनी पावती फाडायचे काय काम होते. कोकण महोत्सवाचादेखील असाच विषय झाला होता.

**दिनेश नलावडे :-**

त्यांनी पावती फाडलेली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

याबाबत पावती फाडलेली आहे. मी ठोस काही सांगू शकत नाही, पण मला जयंत पाटील हे भेटलेले आणि ते या महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक आहेत.

**याकुब कुरेशी :-**

पावती फाडली आहे असे बोलून तुम्ही कशी दिशाभूल करता? खात्रीशीर तुम्ही माहिती घ्या आणि नंतर विषय मांडा.

**चंद्रकांत वैती :-**

मी येथे ज्यांच्याबद्दल बोलतोय ते या महापालिकेचे सन्मा. नगरसेवक आहेत आणि त्यांनी मला सकाळी फोन करून सांगितले की, मी याबाबत सर्व पुर्तता केलेली आहे. मला सभेला यायचे होते

म्हणून मी तिथे गेलो नाही. परंतु त्यांनी ह्याच्यामध्ये स्थळदेखील लिहिलेले आहे आणि ते नगरसेवक आहेत आणि तुमच्या आमच्यापैकी आहेत म्हणून आपल्याला या विषयामध्ये ठोस निर्णय घ्यायचा आहे. सभापती साहेबांचे बोलण्याचे प्रोव्हीजन असे की, सभापती साहेबांनी सांगितले की आपण हा विषय सभागृहात घेउ नये. गेल्या आठवड्यात जेव्हा हा विषय आला तेव्हा सन्मा. सदस्यांनी सांगितले की, हा विषय रितसर पुढील सभेत विषयपटलावर आणा आणि आता विषयपटलावर विषय आणल्यानंतर तुम्ही प्रश्न विचारला की, सभापती साहेब तुम्हाला माहित नव्हते का? तर मागच्या सभेत आपल्या सदस्यांनी सांगितले म्हणून हा विषय आला. हे सन्मा. नगरसेवक आहेत आणि त्यांनी त्या बाबतीत पत्रिका छापली आहे. तुम्ही ती पत्रिका बघा. त्यांच्या भावाच्या मुलीचे लग्न आहे आणि नवघरचे मैदान आपण यापुर्वी लग्नांना, कार्यक्रमांना, धार्मिक कार्यक्रमांना दिलेले आहे. मागचा जो ठराव होता, मालवणी जत्रोत्सवाचा त्यावेळेला सन्मा. नगरसेविका प्रभात पाटील ह्यांनी असे पत्र दिले होते की, रात्री-अपरात्री तिथे स्पीकर चालू असतो, फन ॲण्ड फेअरचे पाळणे लागतात त्याच्यामुळे आवाज येतो, प्रदुषण निर्माण होते म्हणून तिथे अशा मनोरंजनाच्या कार्यक्रमाला कुठल्याही प्रकारची परवानगी देउ नये. लग्नविधीला आपण ह्याच्यापुर्वी परवानगी दिलेली आहे आणि आता द्यावी, न द्यावी तो सभागृहाचा निर्णय आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, स्थायी समिती दि.२३/१/२००३ प्रकरण क्र. १०७ नवघर शाळेचे मैदान शैक्षणिक व सामाजिक संस्थांना कार्यक्रमाकरिता देणेबाबत, ठराव क्र. ११० (ठरावाचे वाचन केले) ठराव असा झालेला आहे की, सुट्टीच्या दिवसात आपण नागरिकांना मैदान देउ शकतो.

**नितीन ठाकूर :-**

सभापती महोदय, माझे असे म्हणणे होते की, येथे पत्रिका छापून आलेली आहे. व त्या पत्रिकेवर त्या मैदानाचा पत्ता टाकलेला आहे तर त्यांनी पत्ता टाकण्याच्या अगोदर परवानगी घ्यायला पाहिजे की, नंतर?

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, अगोदर परमीशन घ्यायला पाहिजे. ठिक आहे. परंतु अर्ज १२/१/२००४ रोजी केलेला आहे. पैसे भरलेले आहे पत्रिका छापलेली आहे आणि आम्ही ते मैदान कशासाठी नामंजुर केलेले आहे तर मेळा, मनोरंजनाचे कार्यक्रम, तिथे मोठमोठे मशिनरी वगैरे लागतात त्याच्यासाठी आपण नामंजुर केलेले आहे.

**याकुब कुरेशी :-**

नलावडेजी आता वैती साहेब बोलले की, पावती फाडलेली नाही आणि तुम्ही बोलता पावतीचे पैसे भरलेले आहेत.

**दिनेश नलावडे :-**

अर्ज दिलेला आहे. पैसे भरलेले आहे. त्यांनी मला लिहून दिलेले आहे.

**याकुब कुरेशी :-**

पण ह्याच्या अगोदर सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी ऑब्जेकशन घेतलेले आहे की, तिथे ध्वनीप्रदुषण आणि घाण होते म्हणून.

**दिनेश नलावडे :-**

तिथे कशासाठी ऑब्जेशन आहे तर तिथे मेळा भरतो, यात्रा भरतात. बिरहा असे कार्यक्रम दोन-तीन दिवस चालतात. अशा कार्यक्रमासाठी तिथे तिकीट लावलेले असतात. आपण जर प्रत्येक गोष्टीसाठी नाही म्हणून म्हटले तर आपल्याला हे मैदान हवे कशाला?

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठराव झाल्यानंतर ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ती त्यांनी बजावली पाहिजे. हे सभेपुढे आणण्याची काय आवश्यकता आहे?

**दिनेश नलावडे :-**

हे मैदान माझ्या प्रभागामध्ये येत आहे आणि आपण त्याचा नियम पाळतही नाही. त्याचा त्रास आम्हाला होतो.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, मी ह्याच्यासाठी बोलतोय आपण असे विषय सभागृहापुढे आणू नका.

**अनंत पाटील :-**

दोन नंबर वार्डमध्ये तो वार्ड तसा माझा ही होता, जर तुम्हाला द्यायचे असेल तर त्याचेवेळी ठराव झाला असता आणि ह्या ठरावावर आता चर्चा करण्याची आवश्यकता नव्हती.

**नितीन ठाकुर :-**

साहेब दोघांना तुम्ही देउन टाका.

**मा. सभापती :-**

पहिला ह्याचा ठराव झालेला आहे व त्याला प्रशासन जबाबदार आहे. त्यांना काय करायचे आहे त्याला तेच जबाबदार राहतील. कारण कोणीही काही केले जर टाळले ठोकले तरी त्यांना ठोकून घ्यावे लागेल त्यांना आज नाहीतर उद्या. पण आपला जो ठराव मंजुर केलेला आहे तोच ठराव मंजुर आहे व तो ठाम राहिल. ठराव ह्यापुर्वीच मंजुर झालेला आहे आणि आज त्याच्यावर चर्चा करता येत नाही.

**अनंत पाटील :-**

ग्रामीण भागामध्ये जागेची अडचण आहे आणि त्यांना हे मैदान देण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. आपण अटीशर्ती वाढवून घ्या. अटीशर्ती लावा आणि द्या.

**मा. सभापती :-**

नाही देउ शकत. जी.आर. मध्ये आपण दिलेले आहे अशासाठी आपण देउच शकत नाही.

**अनंत पाटील :-**

तिथे पटांगणावर बरेचसे लोकांना आपण ह्या अगोदर जागा दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

या ठरावापुर्वी दिलेले आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, ते एक सन्मा. नगरसेवक आहेत व त्यांनी पत्रिका छापलेल्या आहेत. आज त्यांनी एवढा खर्च केलेला आहे आणि दोन्ही बाजूने पत्रिका छापलेल्या आहेत, पैसे भरलेले आहे, अर्ज केलेला आहे.

**मा. सभापती :-**

पैसे घेउन पावती कोणी घेतले त्या अधिकाऱ्याला धरून आपण मारा. मी असे सरळ सांगतो. पैसे ज्यांनी घेतले असेल त्या अधिकाऱ्याला मी ससपेन्ड करेल. ते मी आता ही सांगतो.

**याकुब कुरेशी :-**

पावती कोणी फाडली आहे आपण त्या अधिकाऱ्याला येथे सभागृहासमोर बोलावून घ्या. व पावती फाडली का नाही त्याचा आता लगेच खुलासा होईल. आपण हा काय प्रकार लावलेला आहे, एकाला आपण नाही सांगता आणि दुस-याला हो म्हणून सांगता. ते पण माजी नगरसेवक होते, माजी सभापती होते.

**दिनेश नलावडे :-**

ते मैदान आहे आणि ते पटांगण आहे दोघांमध्ये फरक आहे.

**याकुब कुरेशी :-**

पावती कोणी फाडली त्यांना आपण येथे बोलावून घ्या.

**दिनेश नलावडे :-**

आणि ह्याच्यानंतरचा निर्णय घ्या. तुम्हाला वाटेल तो.

**चंद्रकांत वैती :-**

हे नगरसेवक आहेत व येथील स्थानिक आहेत.

**याकुब कुरेशी :-**

तर तेही स्थानिकच होते. ते माजी सभापती होते. असे काय बोलता तुम्ही, एकाला न्याय देता आणि दुसऱ्यावर अन्याय करता. हा कुठला प्रकार आहे. ही जी पावती कोणी फाडली आहे आणि ती पावती आपण मागून घ्या. आम्हाला पावती बघायची आहे.

**मा. सभापती :-**

पावती कोणी फाडली त्या अधिकाऱ्याला आपण ससपेन्ड करू. हा माझा निर्णय आहे. जो निर्णय ठाम आहे तो ठाम आहे.

**नितीन ठाकुर :-**

माझ्या मते पावती बांधकाम विभागामार्फत दिली जाते.

**दिपक खांबीत :-**

बांधकाम विभागाने परवानगी दिलेली नाही आहे आणि परवानगी दिल्यानंतर पावती फाडण्यात येते.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, पावती न फाडता पत्रिकेवर कसे काय पत्ता छापला.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रशासनाकडून पावती फाडण्यात आलेली नाही.

**नितीन ठाकूर :-**

पत्रिकेवर पत्ता कसा काय आला?

**दिनेश नलावडे :-**

ते खेळाचे मैदान नाही आहे.

**याकुब कुरेशी :-**

प्रभात पाटील ह्यांनी पत्र दिले आहे आणि त्यांचेच ऑब्जेकशन आहे. व त्या ऑब्जेकशनवरच आपण दहा दिवसासाठी फाडलेली पावती पाच दिवस असे केले.

**शरद पाटील :-**

पण तो ठराव तसा नवघर मैदानाचा आपण केला होता. तोच ठराव आता मी वाचून दाखविला.

**याकुब कुरेशी :-**

माझे, लग्नकार्यासाठी ती जागा देण्याकरिता विरोध नाही.

**मा. सभापती :-**

शासनाच्या जी. आर. प्रमाणे प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**प्रकरण क्र. २२२ :-**

नवघर मराठी शाळेचे मैदान लग्न कार्यानिमित्त भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. २०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पूर्व नवघर शाळा क्र. १३ समोर महानगरपालिकेचे मैदान आहे. सदर मैदान भाड्याने देणे बाबत मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ११० दि. २३/०१/२००३ अन्वये ठराव पारीत झालेला आहे. तसेच मैदान वापराबाबत शासन निर्णय कलम ३७ 'अ' नुसार परिपत्रकसुद्धा आहे.

शासनाचे परिपत्रक व स्थायी समितीचा निर्णय तपासून प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव वाचून ठराव कायम करण्यांत येत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २२३ चे वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मला असे विचारायचे आहे की, असे देता येते का?

**मा. उपआयुक्त (कल्याण केळकर सो.) :-**

प्रकरण क्र. २२३ बाबत आम्ही टिपणी दिलेली आहे, मा. आयुक्त साहेबांनी व ती अगदी स्वयंस्पष्ट अशी टिपणी आहे. आरक्षण जे आहे ते आरक्षण ठेवण्याचे अधिकार फक्त भारतीय घटनेच्या

३४२ सेक्शननुसार फक्त केंद्र शासनाला आहे. त्यानंतर राज्य शासनाला काही प्रमाणात ते अधिकार शासनाने दिलेले आहे, त्यामध्ये घटनात्मक तरतुदीनुसार ४५ टक्के आरक्षण हे केंद्र शासनामार्फत निश्चित करण्यात आलेले आहे आणि १९६५ पासून २७ टक्के आरक्षण हे राज्य शासनामार्फत घेण्यात येतो ४ टक्के विमुक्त भटक्या जमातीला दिला जातो, ५ टक्के प्रकल्पग्रस्तांना ठेवण्यात येते, तसेच जे माजी सैनिक आहेत त्यांच्याकरिता १५ टक्के आहेत आणि अंपगांसाठी ३ टक्के आहे. असे २७ टक्के आरक्षण ठेवण्याचे राज्य शासनाला अधिकार आहेत आणि केंद्र शासनाला ४५ टक्केची तरतुद आहे. त्यानंतर प्राधान्य देणे ही बाब दुय्यम स्वरूपाची आहे. जर कोणताही खेळाडू आपल्याकडे इंटरव्ह्यूला आल्यानंतर निवड करताना त्याला प्राधान्य द्यावे त्याचे व्यक्तीमत्व बघून, गुणवत्ता तत्वावर त्यांना प्राधान्य देण्याचे आपल्याला अधिकार आहेत. असे प्राधान्य आपण खेळाडूंना देउ शकतो. पण आरक्षण आपल्याला देता येणार नाही.

**याकुब कुरेशी :-**

म्हणजे प्रश्न मिटला. हा विषय येथेच संपला. जर आपल्याला आरक्षण देताच येत नाही मग त्याच्याबद्दल प्रश्नच येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाच्या या विषयाच्या फेवरला मी बोलतोय, कारण या टिपणीमध्ये असे दाखवले गेले आहे की, नियमच नाही तो कायदाच नाही असे नाही आहे. आपल्या बाजूच्या ज्या ठाणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी त्यांच्या इथल्या खेळाडूंना अशा प्रकारे आपल्या सेवेमध्ये भरती करून घेतल्याचे पत्र आहे. ते आयुक्त सुद्धा आय.ए.एस. आहेत आणि हे आयुक्त सुद्धा आय.ए.एस. आहेत. नियम सारखाच आहे. दोन्ही महानगरपालिकेला एकच कायदा आहे. त्या महापालिकेमध्ये जर खेळाडूना घेतले जाते तर आपल्याकडे आपण का घेउ नये. मी तर असे म्हणतो की, जे खेळाडू अनेक वर्षापासून आपल्या महानगरपालिकेचे नाव काढत आहे. प्रत्येक खेळामध्ये ते सहभाग घेत आहेत आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सगळया खेळांमध्ये त्यांचा चांगला अनुभव आहे. अशा खेळाडूंना आपण घेतले पाहिजे. मी ह्याच्या बाजूने ठराव मांडतो की, आपण ह्या खेळाडूना घ्यावे.

**आसिफ शेख :-**

कोण कोण आहेत ते खेळाडू?

**चंद्रकांत वैती :-**

दोन टक्के आरक्षणामध्ये आपण त्यांना घ्यावे. त्यात हेतू काय आहे तर ह्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक खेळाडूना आपल्याला प्रोत्साहन द्यायचे आहे.

**आसिफ शेख :-**

आता आपल्या महापालिकेच्यावतीने बाहेरील खेळाडू येउन खेळतात तर त्यांना घ्यायचे का, स्थानिक खेळाडूंना घ्यायचे.

**चंद्रकांत वैती :-**

स्थानिक खेळाडूंना प्राधान्य द्यावे. या शहराचा एकतरी नागरिक असू द्या.

**आसिफ शेख :-**

राज्यपातळीवर ज्या स्पर्धा होतात. त्याठिकाणी आपले खेळाडू कमी असतात आणि बाहेरचे खेळाडू जास्त असतात व ते आपल्याला पुरस्कार प्राप्त करून देतात. मग त्यांना घेणार की, स्थानिक खेळाडूना घेणार?

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, मिरा भाईंदरमध्ये स्थानिक कोण आणि परका कोण? कारण अनेक आता नविन नविन अशा वसाहती झालेल्या आहेत व चांगले क्वॉलिफाईड लोक तिथे आहेत. खेळाडूसुद्धा अगदी अप्रतिम चांगले चांगले आहेत, गोल्डमेडलीस्ट देखील आहेत. त्यांना आपण नाकारणार आहोत. त्यांना सुद्धा घेतले पाहिजे. स्थानिक म्हणजे कोण?

**चंद्रकांत वैती :-**

स्थानिक म्हणजे या क्षेत्रात राहणारे.

**आसिफ शेख :-**

नाहीतर बाहेरच्या लोकांना तुम्ही घेणार काय?

**मिलन म्हात्रे :-**

जर त्याच्याकडे रेशन कार्ड आणि टॅक्स पावती आहे आणि तो कायमचा इकडचा नागरिक आहे. त्याला आपण नाकारू शकतो का?

**आसिफ शेख :-**

स्थानिकच पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

तो खेळाडू असला पाहिजे त्याबरोबर स्थानिकही पाहिजे.

**आसिफ शेख :-**

समजा आता चंद्रकांत वैती आहे आणि त्यांच्या नावाने कोण खेळला तर त्यांचे नाव होईल.

**मिलन म्हात्रे :-**

आपण अर्थाला अनर्थ लावू नका. आपल्या क्रिडा क्षेत्रामध्ये आपल्या ज्या स्पर्धा आहेत त्याच्यामध्ये खेळलेले आतापर्यंतचे खेळाडू त्यांनी दहा वर्ष, पाच वर्ष त्यांनी जे योगदान प्रत्येक खेळामध्ये आपल्याला दिलेले आहे. त्यांचा सगळयात पहिला येथे विचार झाला पाहिजे. सभापती साहेब, जसे आपण इतर ठरावामध्ये नमुद करतो की, ठाणे महानगरपालिकेमध्ये असे असे काम केले आहे किंवा अशी अशी पद्धती सुरू केलेली आहे. नवीन मुंबई केले आहे. तसे ह्या टिपणीमध्ये कुठेच उल्लेख नाही. हा निगेटीव्ह ॲप्रोच आहे.

**आसिफ शेख :-**

सही जी केली आहे, ती उपआयुक्त, मुख्यालय ह्यांनी सही केली केलेली आहे.

**मा. सभापती :-**

श्रीकांत मोरे मी ह्या सोबत ठराव द्यायला सांगितले होते, तो ठराव कुठे आहे आणि आता तुम्ही वेळेवर गोषवारा देता आणि एवढ्या दिवसापासून गोषवारा मागतो तर आपण गोषवाराच देत नाही आणि आज तुम्ही हा गोषवारा देता. आता का दिला? आणि मी तुला सांगितले होते की, हा ठराव ह्याच्याबरोबर द्या तर का दिला नाही? नवी मुंबई महानगरपालिकेचा मान्य झालेला असा जो ठराव होता त्याची कॉपी मी तुम्हाला द्यायला सांगितली होती तर तुम्ही का दिली नाही? हे जे तुम्ही काम करता ते बरोबर नाही.

**आसिफ शेख :-**

येथील स्थानिक खेळाडूना प्राधान्य दिले पाहिजे त्या मताशी संपुर्ण सभागृह सहमत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण त्या दोन्ही महापालिकेचा उल्लेख करा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, या ठिकाणी दोन टक्के आरक्षण देण्यासाठी सर्व सभासद सहमत आहेत. परंतु जर प्रशासनाची भुमिका आपल्या विरोधात असेल तर पुन्हा आयुक्त साहेब हा ठराव त्याच्या अधिकाऱ्यात रद्द करतील. कारण ऑलरेडी एक ठराव त्यांनी रद्द केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून सभापती साहेब आपण या ठरावात असे नमुद करून घ्या की, नवी मुंबई आणि ठाणे या महानगरपालिकेच्या दोन्ही आयुक्तांनी यापुर्वी अशी पदे मंजुर केलेली आहे. ते आरक्षण मंजुर केलेले आहे. त्याचा आम्ही ह्याला इफेक्ट देतोय आणि त्या निर्णयानुसार आम्ही हा ठराव पास करतोय.

**याकुब कुरेशी :-**

ठाणे महानगरपालिका ही किती जुनी आहे. ते आपण बघितले पाहिजे.

**आसिफ शेख :-**

प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये वादविवाद नको.

**याकुब कुरेशी :-**

आपल्याला इनमिन दीडवर्ष झाले आणि आपण लगेच त्यांची बरोबरी करायला लागलो. आपण त्यांची बरोबरी करू शकतो का?

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण काय करा लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांची एकमेकांच्या विसंगत अशी भूमिका झालेली आहे. तर आपण आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करा आणि त्यामध्ये निर्णय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला चर्चा करण्याची काही गरज नाही. ठाणे महानगरपालिकेने, मुंबई महानगरपालिकेने तसे दिले आहे.

**आसिफ शेख :-**

जर आपला गोषवारा, टिपणी नकारात्मक असेल तर मग ३५८ या सेक्शनखाली पुन्हा पाठवतील. ते आपला ठराव रद्द करतील. आपण मागच्या प्रकरणात सांगितले श्री. वेदपाठक ह्यांना नेमण्यासाठी आपण इथे प्रस्ताव नामंजुर केला आणि नाईक साहेबांची नियुक्ती केली. नंतर प्रशासनाने सांगितले की, नाईक साहेब काम करायला तयार नाही. ही बाब त्यांनी आपल्या निदर्शनास आणून द्यायला पाहिजे होती पण त्यांनी ती आणली नाही आणि परस्पर नोटीस लावली. व आता ह्या ठिकाणी प्रशासनाचा जो गोषवारा आलेला आहे, तो गोषवारा अग्नेस्टमध्ये आहे. म्हणजे प्रशासनाची या सदंर्भात निगेटीव्ह भूमिका आहे आणि आपण पुन्हा त्याला पॉझेटिव्ह करायची व पुन्हा आयुक्त साहेबांनी ते रद्द केले तर काय होईल?

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे प्रोसिडिंगला नोंद करून घ्या की, जे काम स्थायी समितीने ठरवून दिले आहे काम त्याला कामाला ह्या महापालिकेचा पगार आणि मीठ खात असलेले शिवमुर्ती नाईक साहेब ह्यांनी नाही म्हणून सांगितले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मी हे काम करणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण नोंद करून घ्या की, ते काम करायला तयार आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पत्र येउ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमचे नाव आम्ही ह्याच्यात नक्की केले आणि केळकर साहेबांचे असे म्हणणे त्यांनी असा खुलासा केला, तुम्ही आयुक्त साहेबांकडे जाउन तुम्हाला काम भरपुर आहे, तुम्हाला वेळ नाही असे सांगितले आणि त्या कामाला नकार दिला आहे. ही गोष्ट खरी आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आयुक्त साहेबांबरोबर चर्चा झाली आणि कामाचा व्याप आहे असे सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जर नकार दिला तर स्थायी समितीने दिलेला निर्णय तुम्हाला मान्य नाही असे होईल.

**आसिफ शेख :-**

आपण काम करायला तयार आहात का?

**मिलन म्हात्रे :-**

आपण उपविधीचे जे काम आहे ते करायला तयार आहात का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कामाचा व्याप वाढला आहे आणि वसुलीचे मार्चपर्यंत काम भरपूर आहे. म्हणून मार्च महिन्यानंतर काम करतो असे सांगितले. परंतु साहेबांना ते काम इमिजिएट करायला पाहिजे आणि प्रमोशन द्यायची आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या नावाची आम्ही नियुक्ती केलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मार्च महिन्यापर्यंत कामाचा लोड जास्त आहे.

**आसिफ शेख :-**

आपण सांगता की, मी काम करायला तयार आहे. प्रशासनाच्यावतीने आपल्या अनुपस्थितीत सांगण्यात येते की, नाईक साहेब काम करण्यास तयार नाही. मग आम्ही समजायचे काय? सभागृहाची दिशाभूल चालली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण ऐकूण घ्या.

**आसिफ शेख :-**

सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही अशी परिस्थिती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मार्च महिन्यानंतर काम करू म्हणून सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाईक साहेब तो जो निर्णय झाला त्यावेळेला आपण इथे बसलेले होता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी येथे नव्हतो.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये असे चांगले खेळाडू आहेत आणि जर त्यांना आपण वाव दिला तर प्रत्येक देशपातळीवर, राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर, महानगर पातळीवर, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळ खेळतात अशा लोकांना अशा खेळाडूंना असे प्राधान्य दिले जाते आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेला जर नावाने खरोखर मिरा भाईंदरच्या बाहेर जर आपल्याला न्यायचे असेल तर आपल्याला खेळाडू पाहिजेत आणि जर अशी तरतुद असेल तर आपण अशी तरतुद केली पाहिजे. आपण अशा काही बाबी करतो, काही गोष्टी करतो जसे आपण काही लोकांना मानधनावर ठेवतो. सहा महिन्यावर ठेवतो आणि जर आपल्याकडे काम करणारा कर्मचारी आहे आणि त्या कर्मचा-याला आपण स्कोप दिला तर अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेला स्कोप दिला असे होते, असे ठरते. त्याच्यामुळे हा जो विषय आणला आहे तो चांगला विषय आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्या खेळाडूचा दर्जा लक्षात घ्यायला पाहिजे. व त्यांचा दर्जा काय असावा?

**आसिफ शेख :-**

त्याची कुवत काय? त्याची गुणवत्ता, कार्यक्षमता, त्याने प्राप्त केलेले पुरस्कार आणि तो स्थानिक असला पाहिजे. शासनाचे जे नियम आहेत स्थानिकाचे त्या व्याख्यामध्ये तो मोडला पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

तो पंधरा वर्षतरी स्थानिक पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा दर्जा व्यवस्थित नाही म्हणून आपल्याकडे खेळून चांगले पुरस्कार आणतात का? ह्याचा अर्थ आपण असा पकडायचा का?

**आसिफ शेख :-**

अर्थ लावाल तसा लागेल. मराठी भाषा आहे जशी वळवाल तशी वळेल.

**मिलन म्हात्रे :-**

अर्थ त्याचा असा होतो आपल्याकडे जे खेळाडू आहेत त्यांनी चांगले चांगले प्राइजेस आणले आहेत.

**आसिफ शेख :-**

आपल्या येथे सगळयांची भावना अशी आहे की, खेळाडूंना नोकरी भरतीमध्ये दोन टक्क्यांनी प्राधान्य द्यायला पाहिजे आणि ती देत असताना त्याची गुणवत्ता, त्याची कार्यक्षमता व त्याने जे पुरस्कार प्राप्त केले आहे ते सर्व तपासून घेतले पाहिजे व तो स्थानिक असला पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य क्रिडा धोरण २००१ जाहिर केले. त्यामधील मुद्दा क्रमांक ८.३ हे मी वाचून दाखवितो. खेळाडूंना शासकीय निमशासकीय सेवेत प्राधान्य. आरक्षण म्हटले नाही तर प्राधान्य. सन १९९६ च्या क्रिडा धोरणामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदक विजेत्या खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शासकीय सेवेत प्राधान्य देण्याबाबत धोरण ठरविण्यात आले होते. परंतु आरक्षणासाठी असलेल्या घटनात्मक तरतुदी व राज्य शासनाने वेळोवेळी याबाबत विविध

घटकासाठी जाहिर केलेले आरक्षण यामुळे एकूण आरक्षणाची टक्केवारी आवश्यकतेपेक्षा अधिक झाली असल्यामुळे इतर बाबींचा सर्वांगाने विचार करता, खेळाडूंसाठी आरक्षण ठेवणे शक्य होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण मला सांगा, हे कायम स्वरूपी आहे, ठेका पद्धतीवर आहे, कशाकरिता आहे. हा नियम कशाकरिता आहे ते आपण पहिल्यांदा सांगा. परमनन्ट करता आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.):-**

परमनन्टकरिता नाही सर्वांकरिता आहे. घटनेने ७५ टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण ठेवायचे नाही. आज घटनेमध्ये राज्य शासनाकडून ४३ टक्के आरक्षण ठेवले जाते आणि केंद्र शासनाकडून ४५ टक्के आरक्षण आहे आणि राज्य शासनाचा २७ टक्के आरक्षण आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे कायम का, अकायम. कारण हे सगळे नियम जे तुम्ही वाचून दाखविले तर आतापर्यंत काही खेळाडू आपल्या आस्थापनेवर नसतांना खेळून नगरपालिकेचे नाव कमवून आणतात (मेडल) मग ते कसे काय होते?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.):-**

प्राधान्य देता येते.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आरक्षण म्हणू नका. प्राधान्य असे बोला.

**आसिफ शेख :-**

आरक्षण शब्द वगळून प्राधान्य द्या.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, या विषयामध्ये आरक्षण आहे म्हणून माझा विरोध होता.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मंजुर का?

**मा. सभापती :-**

प्राधान्य देण्यात यावे. ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २२३ :-**

जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट खेळाडूंना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर २% आरक्षण ठेवणेबाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. २०४ :-**

मा. स्थायी समिती सभापती यांनी क्रिडास्पर्धामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंना मिरा भाईंदर महानगरपलिका आस्थापनेवर दोन टक्के आरक्षण प्रस्तावीत करणेसाठी पत्र दिले आहे. शासकिय, निमशासकिय सेवेत परस्पर / सरळ सेवेने भरती करीता विविध घटकांसाठी जाहिर केलेल्या आरक्षणामध्ये राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय पातळीवरील पदक विजेत्या खेळाडूंना आरक्षण ठेवल्याबद्दल समावेश नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर खेळाडूसाठी दोन टक्के आरक्षण प्रस्तावीत करणे शक्य नसल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर भरती करतांना राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवरील पदक / प्रमाणपत्र विजेते खेळाडू व स्थानिक खेळाडू यांना गुणवत्तेनुसार प्राधान्य देणेंस सहा महिन्यासाठी तात्पुरती नियुक्ती करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**